## १ मेपासून एक राज्य एक नोंदणी मोहीम



**मुंबई :** आपल्या राहत्या ठिकाणापासून जवळ असलेल्या किंवा कोणत्याही निबंधक कार्यालयात मालमत्ता खरेदी आणि विक्रीची नोंदणी करण्यासाठी महसूल विभाग १ मे महाराष्ट्र दिनापासून 'एक राज्य, एक नोंदणी' सुरू करणार आहे. सरकारच्या या धोरणामुळे राज्यातील जनतेला दिलासा मिळणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्यातील एका ठिकाणचा दस्त अन्य कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येत नव्हता. एका जिल्हा सहनिबंधक कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या खरेदी-विक्रीच्या दस्तांची नोंदणी त्याच सहनिबंधक कार्यालयामध्ये केली जात आहे. त्यामुळे खरेदीदार आणि विक्री करणाऱ्यांचा वेळ आणि पैसे वाया जात होता. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग एक राज्य, एक नोंदणी हा उपक्रम सरकार राज्यात सुरू करीत आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २५७
www.ramprahar.com

शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रोह्यातील उन्हाळी भातशेती लागवड क्षेत्र घटले/२

महाड एमआयडीसीत कंपनीचे गोदाम आगीत जळून खाक/५

रायगडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड/८

### तळोजा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून बैठक





## मंत्री उदय सामंत यांचा सकारात्मक प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनात समाविष्ट गावांतील बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या समवेत गुरुवारी (दि. ३) मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेतून उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

मंत्रालयात मंत्री उदय सामंत यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात चिंध्रण, महालुंगे, कानपोली प्रकल्पग्रस्त सामाजिक संघटनेचा सहभाग होता. त्यामध्ये भाजपचे तालुका खजिनदार शिवाजी दुर्गे, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, चिंध्रण सरपंच एकनाथ पाटील, कानपोली सरपंच मदन मते, खानाव सरपंच मनोहर आरीवले, मोहन कडू, अरुण देशेकर, नरेश सोनावळे, गणपत कडू, ज्ञानदेव पाडेकर, सज्जन पवार, अनंता कडू, अनंता गडगे, भगवान कडू आदींचा समावेश होता. या बैठकीला संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडत त्यांच्या मागण्या योग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. या वेळी मंत्री उदय सामंत यांनी या बाबतीत शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे अधोरेखित केले.

तळोजा अतिरिक्त एमआयडीसीकरिता पनवेल तालुक्यातील चिंध्रण, कानपोली व महालुंगे या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. या भूसंपादनाने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांच्या मागण्यांबाबत लोकप्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर, भूसंपादन अधिकारी तथा पनवेल उपविभागीय अधिकारी, एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी यांना निवेदन दिले होते. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्रव्यवहार करत बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने ही बैठक झाली.

बाधित शेतकरी, भूसंपादन अधिकारी व एमआयडीसीचे अधिकारी यांची संयुक्त बैठक झाली होती. या बैठकीत बाधित शेतकऱ्यांनी बाधित शेतकऱ्यांना जमीन संपादनाच्या मोबदल्यात देण्यात येणारी नुकसानभरपाई, भूखंड परतावा, भूखंड देताना ईएमडी व डेव्हलपमेंट चार्जेस आकारले जाऊ नयेत तसेच संपादित होणाऱ्या जमिनीमधील घर, झाडे, विहिरी, तलाव, बोअरवेल यांची नुकसानभरपाई देण्यात यावी. संपादित गुरचरण जमिनीऐवजी गुरचरणासाठी पर्यायी भूखंड मिळावा, अशी मागणी केली होती. आणि त्या मागण्या एमआयडीसीकडे पाठविण्याचे भूसंपादन अधिकारी तथा पनवेल उपविभागीय अधिकारी यांनी मान्य केले होते. या मागण्या उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत एमआयडीसीला कळविण्यात आल्यानंतरदेखील या संदर्भात शेतकऱ्यांशी अथवा शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नव्हती. त्यामुळे जमिनीचा प्रति गुंठा मोबदला ठरविण्यात आला त्या वेळेला तो झाडे त्याचबरोबर घरे, विहीरी, तलाव, बोअरवेल यांच्या व्यतिरिक्त हा मोबदला असल्याची ग्रामस्थांची समजूत होती आणि तसे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनीदेखील सांगितले. त्यामुळेच हा मोबदला शेतकऱ्यांनी स्वीकारला, मात्र जागेत घरे, झाडे, विहीरी, तलाव, बोअरवेल आहेत. **(पान २ वर..)**

# ॲड. आस्वाद पाटील करणार १६ एप्रिलला भाजपमध्ये प्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे भाचे, शेकापचे माजी जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील येत्या १६ एप्रिल रोजी आपल्या काही सहकाऱ्यांसमवेत भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. मुंबईत हा पक्षप्रवेश होणार असल्याचे असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.



विधानसभा निवडणुकीत अलिबाग मतदारसंघातून माजी जि.प. उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांना डावलत शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी त्यांची सून व महिला आघाडी जिल्हाप्रमुख चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे आस्वाद पाटील आणि माजी आमदार पंडित ऊर्फ सुभाष पाटील निवडणुकीत अलिप्त राहिले होते. विधानसभा निवडणूकीत चित्रलेखा पाटील यांचा पराभव झाला. शिवसेना आमदार महेंद्र दळवी सलग दुसऱ्यांदा निवडून आले.

निवडणुकीनंतर ॲड. आस्वाद पाटील यांनी जिल्हा चिटणीस पदासह पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून ते भाजपच्या संपर्कात असून १६ एप्रिल रोजी मुंबईत ते आपल्या निवडक सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

पनवेल, उरण, अलिबाग, पेण, मुरूड, खालापूर या तालुक्यामधील शेकापचे काही नेते आणि कार्यकर्ते ॲड. आस्वाद पाटील यांच्या संपर्कात आहेत. हा गट ॲड. पाटील यांच्यासोबत भाजपमध्ये प्रवेश करेल असे बोलले जात आहे.

ॲड. आस्वाद पाटील हे शेकापच्या माजी आमदार स्व. मिनाक्षीताई पाटील यांचे चिरंजीव आहेत. शेकापचे जिल्हा चिटणीसपद त्यांनी प्रदीर्घकाळ सांभाळले आहे. अलिबाग पंचायत समितीचे सभापतीपद, त्यानंतर जिल्हा परिषदेचे गटनेतेपद, अर्थ व बांधकाम सभापतीपद, उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे.

## वक्फ सुधारणा विधेयक राज्यसभेतही सादर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक बुधवारी तब्बल १२ तासांच्या चर्चेनंतर लोकसभेने बहुमताने मंजूर केले. विधेयकाच्या बाजूने २८८, तर विरोधात २३२ मते पडली. यानंतर हे विधेयक गुरुवारी (दि.३) राज्यसभेत सादर करण्यात आले आहे.

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यसभेत विधेयक मांडले. त्यानंतर यावर चर्चा सुरू होती.

## मुंबईत ड्रोनवर बंदी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत पुढील महिनाभरासाठी ड्रोन, रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलून उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी उद्या ४ एप्रिलपासून लागू होणार असून पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत राहील.

पोलीस आयुक्तालयाकडून जारी करण्यात आलेल्या पत्रकानुसार दहशतवादी किंवा राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलूनचा वापर करून दहशतवादी हल्ला तसेच शहरातील व्हीव्हीआयपी व्यक्तींना लक्ष्य करू शकतात. शहरातील गर्दीची ठिकाणेही लक्ष्य केली जाऊ शकतात. याच अनुषंगाने सर्व प्रकारच्या ड्रोन वापरावर बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जाणार आहे.

## निवडक

### एसटी बसमध्ये प्रवाशाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू

**खोपोली, खालापूर :** एसटी बसने प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खोपोलीजवळ गुरुवारी (दि. ३) घडली. सुनील राम शिंदे (रा. अहिल्यानगर, वय ४५) दादर-स्वारगेट एसटी बसने (एमएच १४ एलएक्स ७२१५) प्रवास करीत होते. ही बस फुडमॉलजवळील राज हॉटेल येथे आल्यावर शिंदे यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### सोलापूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के; नागरिक भयभीत

**सांगोला :** सोलापूर जिल्ह्यात गुरुवारी (दि. ३) सकाळी ११ वाजून २२ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. याची तीव्रता २.६ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली आहे. या भूकंपाचे केंद्र सांगोला येथे जमिनीपासून पाच किमी खाली होते. सांगोल्यासह पंढरपूर, मंगळवेढा येथेही भूकंपाचे धक्के जाणवले. सुदैवाने यात कोणतीही हानी झालेली नाही, मात्र नागरिकांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण पसरले होते.

# वडापावमध्ये आढळला साबणाचा तुकडा

### कर्जतमधील घटना; स्टॉलला ठोकले टाळे



**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकातील स्टॉलमधून घेतलेल्या वडापावमध्ये साबणाचा तुकडा आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत तक्रार दाखल होताच रेल्वे विभागाने संबंधित स्टॉल बंद केला आहे.

मुंबई ते कर्जत असा लोकलने प्रवास करून आल्यावर खोपोली येथील प्रवासी महिला रशिदा घोरी यांनी त्यांच्या दोन मुलांसाठी फलाट क्रमांक २वरील व्ही.के. जैन टी स्टॉलवरून वडापाव खरेदी केला होता. हा वडापाव खाल्ल्याने मुलांच्या तोंडाला फेस आला आणि पोटात मळमळ झाली. या वेळी घोरी यांनी या वडापावची पाहणी केली असता त्यात साबणाचा तुकडा आढळून आला. याबाबत तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता स्टॉलवाल्याने मुजोरी केल्याचा महिलेचा आरोप आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकाराबाबत कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे सचिव गंगावणे यांनी रेल्वे प्रशासनाच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवर तक्रार केली. प्रशासनाने तातडीने स्टॉलधारकाचा परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मध्य रेल्वे प्रशासनाचे कमर्शियल इन्स्पेक्टर शिरीष कांबळे व कर्जत रेल्वेस्थानक प्रबंधक प्रभासकुमार लाल यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार स्टॉलचे शटर पुढील सूचना मिळेपर्यंत बंद केले आहे.

# उद्धव ठाकरेंनी काल मोठा अपराध केला!

### वक्फ सुधारणा विधेयकाविरोधात मतदानावरून उपमुख्यमंत्री शिंदेंचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाविरोधात मतदान केल्यामुळे शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी २०१९मध्ये विचारधारा सोडून अपराध केला होता, मात्र त्यापेक्षा मोठा अपराध त्यांनी काल लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध करून केला, अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री शिंदेंनी केली. ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन मांडलेल्या भूमिकेचाही या वेळी शिंदेंनी समाचार घेतला.

'उबाठा'ने हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार सोडले यावर काल शिक्कामोर्तब झाले आहे. वक्फ बोर्ड विधेयकाला केलेल्या विरोधामुळे बाळासाहेबांचे विचार अजूनही आहेत असे म्हणणाऱ्यांची मान शरमेने खाली गेलीय. 'उबाठा'साठी कालचा दिवस दुर्दैवी होता. वक्फ बोर्ड विधेयकास विरोध करायचा आणि हिंदुत्वाला विरोध नाही म्हणायचे, मात्र त्यांचीच गोंधळलेली परिस्थिती पहायला



मिळाली, पण शिवसेना व भाजपची आजची भूमिका तीच आहे. बाळासाहेब म्हणायचे, देशभक्त मुस्लिमांना आपला पाठिंबा आहे, देशविरोधकांना नाही. हीच भूमिका आम्ही लोकसभेत दाखवल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.

राहुल गांधीची सावली मिळाल्याने 'उबाठा'ला वारंवार पाकिस्तानचे निर्माते मोहम्मद अली जिनांची आठवण येत आहे. अबू आझमी आणि ओवेसी यांची भाषा ते बोलायला लागले आहेत. त्यांचा शॉर्टकट युटी म्हणजे युज ॲंड थ्रो. वापरा आणि फेका ही त्यांची नीती आहे. मला बोलायला लावू नका माझ्याकडे बोलण्यासारखे खूप आहे, असा इशाराही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिला.

### करे तो करे क्या अशी त्यांची अवस्था -बावनकुळे

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांनी पत्रपरिषद घेऊन भूमिका मांडली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. निदान ते किती संभ्रमात, एकाकी आणि खचलेल्या मनस्थितीत आहेत याचे प्रदर्शन पहायला मिळाले. संजय राऊत यांचा उद्देश साध्य झालेला आहे. तुमचे 'संजयराऊताप्नोटिझम' आता पूर्ण झाले आहे. एकीकडे त्यांना साधी भूमिका घेता येत नाही आणि दुसरीकडे लांगूलचालनही सोडता येत नाही. करे तो करे क्या, अशी त्यांची अवस्था झालीय. अरे कहना क्या चाहते हो? असा उच्चार तुम्ही केलात, पण नेमका हाच प्रश्न महाराष्ट्राला ही पत्रकार परिषद ऐकल्यावर तुमच्या बाबतीत पडला आहे, असा टोला बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

# महाडमध्ये अवकाळी पावसाच्या सरी

**महाड : प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसांपासून महाड परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरीदेखील कोसळल्या. त्यानंतर गुरुवारी (दि. ३) सायंकाळी जोरदार अवकाळी पाऊस पडला.



हवामान विभागाने महाराष्ट्राच्या काही भागात अवकाळी पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला होता. त्याप्रमाणे गुरुवारी सायंकाळी महाड शहर आणि परिसरात ढगाळ वातावरण तयार होऊन सायंकाळी पावसाने अचानक सुरुवात केली. सुमारे तासभर पडलेल्या पावसामुळे सर्वत्र पाणी पाणी झाले.

अचानक आलेल्या पावसामुळे बाजारात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची त्रेधातिरपट उडाली. पाऊस थांबेपर्यंत ग्राहकांना दुकानातच ताटकळत थांबावे लागले, तर दुचाकीस्वारदेखील जागोजागी आडोसा घेत थांबले. दरम्यान, अचानक आलेल्या पावसामुळे महावितरण विभागाने खबरदारी म्हणून वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवला होता.

### पिकांना बसणार फटका

अवकाळी पावसामुळे कडधान्य आणि आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. या वर्षी आंबा उत्पादन समाधानकारक नसताना त्यातच पडलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान होणार आहे. आंबा फळ या पावसामुळे खराब होण्याची शक्यता आहे, तर काढणीनंतर कापून ठेवलेल्या कडधान्य पिकावर पाऊस पडल्यामुळे त्याचेही नुकसान होणार असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले.

## युवा कबड्डीपटूचा हार्ट अटॅकने मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली येथील रहिवासी चंदू पाल (वय २१) याचे गुरुवारी (दि. ३) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. चंदू उत्कृष्ट कबड्डी खेळाडू होता.



पूर्वी मुद्रे येथे राहत असताना चंदूला कबड्डीची आवड निर्माण झाली. तेथील नवकुमार क्रीडा मंडळ कबड्डीसाठी प्रसिद्ध आहे. चंदूने मेहनत घेतल्याने तो उत्कृष्ट खेळाडू बनला. त्याला गुरुवारी अस्वस्थ वाटू लागल्याने दवाखान्यात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून डी.डी. भर्णुके यांची पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्याध्यापक भर्णुके यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाणचे स्कूल कमिटी सदस्य विश्वनाथ कोळी उपस्थित होते.**

# रोह्यातील भातशेतीचे क्षेत्र घटले

**रोहा : प्रतिनिधी**

कालव्याच्या पाण्याचा अभाव, पर्यायी उत्पादन व जवळ असलेली एमआयडीसी यामुळे भात शेतीकडे दुर्लक्ष होत असल्याने रोहा तालुक्यातील उन्हाळी भात शेती लागवड क्षेत्र घटत असल्याचे दिसून येते.



एकेकाळी रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जायचे. या जिल्ह्यात सर्वाधिक भात रोहा तालुक्यात उत्पादन होत असत. या तालुक्यातील पोहे संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध होते. आज याच भाताच्या कोठाराला घरघर लागल्याचे दिसून येते.मोठया प्रमाणात भातशेती ओसाड पडली आहे.

रोहा तालुक्यात पावसाळी भातशेती नंतर उन्हाळी भात शेती ही होत असे उन्हाळ्यात कुंडलिका नदीपात्र व कालव्याच्या पाण्यावर भात शेतीची लागवड केली जात होती . पारंपारिक लागवड करून चांगले उत्पादन पूर्वी शेतकरी काढत असत. रोहा तालुक्यात साधारणता १८०० ते २००० हजार हेक्टरवर उन्हाळी भातशेती केली जात असत. तालुक्यात असलेल्या कालव्याच्या पाण्यावर खांब ते पडम,खरापटी तो पुढील परिसरात तर दुसरीकडे कोलाड पासून ते निवी भुवनेश्वर रोहापर्यंत कालव्याचे पाणी येत असत. या पाण्यावर पूर्वी उन्हाळी भात शेती केली जात असत. यासह कुंडलिका नदीच्या तीरावरील गावातीवल शेतकरी सुद्धा उन्हाळी भात शेती करत असत. त्यामुळे उन्हाळ्यातही चांगले उत्पादन शेतकरी भात शेतीतून काढत असत. परंतु आता हे क्षेत्र घटत असल्याचे दिसून येत आहे.

उन्हाळी भात शेती घटण्याचे प्रमुख कारणांमध्ये प्रामुख्याने बंद झालेले कालव्याचे पाणी हे आहे. कालव्याचे पाणी येत नसल्यामुळे भात शेती आता होत नाही. काहींनी पर्यायी कुंडलीका नदीच्या तीरावर भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात केली आहे. ही पर्यायी व्यवस्था म्हणून शेतकऱ्यांनी आता स्वीकारलेली आहे. कालव्याचे पाणी सोडल्यास भात शेतीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे असे बोलले जात आहे.

दुसरीकडे धाटाव औद्योगिक क्षेत्रामध्ये तरुण नोकरी करत असल्याने त्यांचं भात शेतीकडे कमी उत्पन्न मिळत असल्याने दुर्लक्ष झाले आहे. तर काही तरुण रोजगारासाठी मुंबई, पुणे, ठाणे शहराकडे वळले आहेत. त्यामुळे भात शेती ही केली जात नाही. घरी असलेले वडीलधारी माणसं भात शेती करतात. परंतु काहीच ठिकाणी भात शेती ही ओसाड पडली आहे. रोहा तालुक्यात पूर्वी १८०० ते २००० हेक्टर च्या आसपास उन्हाळी भात शेती केली जात असत.

आता हे क्षेत्र घटून २०० आसपास आले आहे. यावर्षी १७० हेक्टर वर उन्हाळी भात शेती करण्यात आली आहे. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली आहे.

# खांदेश्वर पोलिसांनी सात लाखांचे ४० मोबाईल केले मूळ मालकांना परत

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर पोलीसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे विविध राज्यातून ७ लाख ५ हजार रुपये किमतीचे ४० मोबाईल हस्तगत केले असून हे मोबाईल फोन त्यांच्या मालकांना गुरुवार (दि. ३) सुपूर्द करण्यात आले आहेत.

हरवलेले मोबाईल फोन बाबतची तक्रार नोंदविण्याकरीता नागरीकांना भारत सरकारद्वारे सीइआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील सन २०२५ मार्च पर्यतचे गहाळ झालेल्या मोबाईल पैकी एकुण ४० मोबाईल खांदेश्वर पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण केले आहेत.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, पनवेल प्रशांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे. पोनि सचिन परदेशी यांनी दिलेल्या सुचना प्रमाणे सपोनि शरद बरकडे, सपोनि प्रतापराव बंडगर, पोउपनिरीक्षक सुनील साळुंखे, यांनी विविध जिल्ह्यातून व राज्यातुन हस्तगत केलेले फोन मूळ मालकांना परत करण्यात आले.



# कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची काळजी घ्या; महावितरणचे आवाहन

**कल्याण : प्रतिनिधी**

तापमान वाढल्याने कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र खबरदारी न घेतल्याने अपघाताची शक्यता असते. त्यासाठी नागरिकांनी कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची खबरदारी घ्यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कुलरसाठी नेहमी थ्री–पिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्विच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अर्थिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. पंपातून पाणी येत असल्यास वीजपुरवठा बंद करून नंतरच कुलरला हात लावावा. ओल्या हाताने कुलरला कधीही स्पर्श करू नये.

लहान मुलांना नेहमी कुलरपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरू नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येईल, अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. कुलरमधील पाण्याचा पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा. यामुळे विजेचीही बचत शक्य आहे.

# नागझरी चाळ येथे महापालिकेची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका उपविभाग नावडे हद्दीतील नागझरी चाळ येथील अनधिकृतरित्या बांधत असलेल्या गोडाऊनच्या बांधकामावर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार जेसीबी व पोखलँडच्या माध्यमातून तोडक कारवाई करण्यात आली.

या वेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त रविकिरण घोडके, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, प्रभारी अधिक्षक सर्वश्री अमर पाटील, जितेंद्र मढवी तसेच एमएसएफचे जवान, पोलीस अधिकारी,कर्मचारी अतिक्रमण पथक सदर कारवाईस उपस्थित होते.



महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत शेड अथवा बांधकाम केले असता ते तात्काळ काढून टाकावे अन्यथा महापालिकेच्यावतीने त्यावरती तोडक कारवाई करण्योत येईल. तसेच कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची रितसर परवानगी घ्यावी. विनापरवानगी केलेले बांधकाम हे अनधिकृत मानले जाऊन त्यावरत तोडक कारवाई करण्यात येईल नावडे विभागाचे प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील यांनी सांगीतले

## वनमंत्री गणेश नाईक यांचा आज वाशी येथे जनता दरबार

**नवी मुंबई : बातमीदार**

वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. ४) सकाळी १०.३० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे.



नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात तीन प्रतीत सादर करायची आहेत. नागरिक आपले नाव नोंदणी करून आपल्या समस्या किंवा अडचणीचा निपटारा करू शकणार आहेत.

यापूर्वी झालेल्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. ४ एप्रिल रोजी होणाऱ्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्यांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# गावाच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बांधला संवादसेतू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनामार्फत ग्रामपातळीवर विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. जिल्ह्याच्या विकासामध्ये ग्रामविकास आणि लोकसहभाग खुप महत्वाचा असतो. या विकासाबाबत गावकऱ्यांचे अभिप्राय, अपेक्षा, समस्या आणि जिल्हा प्रशासन यांच्यामध्ये जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संवाद सेतू बांधला. निमित्त होते संवाद सेतू उपक्रमाचे.



जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून होत असलेला विकास आणि गावकरी यांच्याशी हितगुज करण्यासाठी संवाद सेतू हा उपक्रम सुरु केला आह. या उपक्रमंतर्गत आपटा आणि कर्नाळा ग्रामपंचायत मधील ग्रामस्थ, शेतकरी, शिक्षक, आरोग्य सेविक, अंगणवाडी सेविका यांच्याशी संवाद साधला.

या उपक्रमाच्या माध्यमातून गाव सक्षम करण्यावर आणि ग्राम विकासात लोकसहभाग वाढविणे तसेच समस्या तात्काळ सोडविण्यास प्राधान्य देणे हा मानस असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी नमूद केले. प्रत्येक आठवड्याला मंगळवार किंवा गुरुवार रोजी सकाळी १० वा. हा संवाद सेतू कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले.

आपटा ग्रामपंचायत उपसरपंच चव्हाण यांनी गावातील गटारी आणि पाणी पुरवठा समस्या सांगितली. याबाबत जिल्हाधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना तात्काळ गटारी स्वच्छ करण्याचे तसेच त्याचे बांधकाम करण्याच्या सूचना दिल्या तसेच नरेगा मधून शोषखड्डे घेण्याबाबत निर्देश दिले. गावातील स्वछता गृह, पाणी पुरवठा, रस्ते, वीज याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणाना दिले. आरोग्य सेवक, शिक्षक पदे रिक्त आहेत. ही सर्व रिक्त पदे लवकरच भरण्यात येईल असेही श्री जावळे आश्वस्त केले. तसेच प्रधानमंत्री जन मन योजने अंतर्गत मंजूर घरकुलाना अनुदान वितरित करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. बानुबाई वाडीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न टंचाई मधून करण्याचे निर्देश तहसीलदार यांना दिल्या.

कर्नाळा ग्रामपंचायत हद्दीत ६० व्यक्तींना शिधा पत्रिका वितरित केल्या आहेत परंतु त्या लिंक होऊन मिळाल्या नसल्याचे मधुकर पाटील यांनी सांगितले. या शिधापत्रिका ८ दिवसात लिंक करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले. कर्नाळा ग्राम पंचायत हद्दीतील सात वाड्या वस्त्या घर व शेतजागा ३१० दावे निर्णयावाचून प्रलंबित आहेत. तसेच ७ वाड्यांना सामुदायिक वनहक्क प्रदान तथापि मोजणी घेऊन ताबा दिलेला नाही व विकास आराखडे प्रलंबित आहेत. याबाबत संबंधित तहसीलदार यांनी तात्काळ कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश यावेळी दिले.

या संवादसेतू उपक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके यांसह तहसीलदार, गट विकास अधिकारी, महसूल अधिकारी, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

## भिलवले धरणात बुडून एकाचा मृत्यू

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील भिलवले धरणात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ३) घडली. कृष्णा उर्फ बाळा विठ्ठल हजारे (वय ५६) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

कृष्णा उर्फ बाळा हजारे हे पाली बुद्रुक गावाजवळ असलेल्या भिलवले धरणाच्या कडेने दामखिंड बाजूकडे पायी चालत जात होते. त्या वेळी अचानक पाय घसरल्याने ते खोल पाण्यात सरकत गेले व त्यांचा बुडून मृत्यू झाला. ही खबर पोलिसांना पोलीस घटनास्थळी पोहचले. मृतदेहाचे चौक ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# चणेरा न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींना सायकलचे वाटप



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील इंग्रजी क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या स्वामी विवेकानंद न्यू इंग्लिश स्कूल चणेरा येथील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना मोफत १०८ सायकलचे वाटप करण्यात आले आहे.

तालुक्यातील स्वामी विवेकानंद न्यू इंग्लिश स्कूल चणेरा या शाळेतील इयत्ता ७ वी ते १० वीच्या मुलीसाठी १०८ सायकल वाटपाचे कार्यक्रम बुधवारी २ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

खासदार सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या विशेष सहकार्यातून या सायकलींचे वाटप करण्यात आले.तर ग्रामीण आणि दुर्गम भागातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना शाळेच्या प्रांगणात उप सभापती रामचंद्र सकपाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत या सायकलींचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी चणेरा विभागीय कुणबी समाज अध्यक्ष पांडुरंग कोंडे, हसमुख जैन, शाळेचे चेअरमन तसेच रोहा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, नितीन डबीर सरपंच ग्रामपंचायत न्हावे, अतिश मोरे सरपंच खांबेर ग्राम पंचायत, मुजमीन गिते सरपंच ग्रुप ग्रामपंचायत खैरे खुर्द, देविदास कांडणेकर ज्येष्ठ नेते माजी सरपंच, महादेवखार प्रशांत मांडलेकर सामाजिक कार्यकर्ते, संतोष भौड माजी सरपंच ग्राम पंचायत सारसोली, अमित साळवकर ग्रामपंचायत सदस्य खैरेखुर्द, तुळशीराम पवार माजी सरपंच चनेरा, गणेश भगत अध्यक्ष रोहा तालुका शेतकरी प्रतिष्ठान, गणेश आंब्रे ग्रामपंचायत सदस्य खांबेरे, अभिजित भोईर पोलीस पाटील टेमघर, रवींद्र आयरे पोलीस पाटील बिरवाडी,किशोर मोरे ग्रामपंचायत सदस्य चनेरा सह पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा ग्रामस्थ, शिक्षक वर्ग आदी विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

पान १ वरुन

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून बैठक

त्याचे स्वतंत्र पेमेंट मिळणे आवश्यक असल्याने या संदर्भात ग्रामस्थांशी कुठलीही चर्चा न घेता एमआयडीसी अथवा राज्य सरकार एकतर्फी निर्णय घोषित करणे हा शेतकऱ्यांवर अन्याय होईल; म्हणूनच आमदार प्रशांत ठाकूर यांनी या विषयावर मंत्री उदय सामंत यांचे व शासनाचे लक्ष वेधले.

संपादित होणाऱ्या जमिनीमधील घर, झाडे, विहिरी, तलाव, बोअरवेल यांची नुकसानभरपाई, याव्यतिरिक्त भूसंपादनाचा १० टक्के परतावा भूखंड विषयावर या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली तसेच रोजगाराच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षण देण्याचेही मान्य करण्यात आले. एकूणच या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाची चर्चा झाली आणि सरकारने सकारात्मक भूमिका दर्शवली.

# बंदिजनांच्या आयुष्यात 'सकारात्मकते'ची पहाट

**मुंबई, : प्रतिनिधी**

क्रोध, द्वेष आणि घृणेपोटी किंवा परिस्थितीमुळे गुन्हे घडत असतात. अशा गुन्हेगारांच्या आयुष्यात भगवद्गीतेच्या माध्यमातून सकारात्मकतेची जोड दिल्यास त्यांच्या आयुष्यात नवी पहाट निर्माण होऊ शकते. याचा प्रत्यय सध्या महाराष्ट्रातील कारागृहातून १९० बंदिजनांच्या साधनेतून दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून कारागृहात भगवद्गीतेच्या श्लोकांचे सूर घुमत आहेत.

मागील वर्षभर गीता परिवाराच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्राच्या केंद्रीय कारागृहात भगवद्गीता संथा वर्ग सुरू आहेत. स्वामी श्री गोविंद देवगिरीजी महाराजांनी स्थापन केलेल्या गीता परिवारातील स्वयंसेवक या उपक्रमामध्ये प्रशिक्षकाची भूमिका पार पाडत आहेत. गीता परिवारद्वारा आजतागायत १२ लाख साधकांना ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले आहे. पूर्णपणे निःशुल्क असे हे वर्ग १३ भाषांतून व २१ 'टाईम स्लॉट्स ' मध्ये सोमवार ते शुक्रवार दररोज घेतले जात आहेत. हा वर्ग ४० मिनिटांचा आहे. वर्गामध्ये गीतेच्या श्लोकांचे शुद्ध उच्चारण शिकवले जाते. राज्यात या उपक्रमाचा व्यापक स्तरावर विस्तार करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमाच्या ऑनलाईन वर्गासाठी तांत्रिक बाबींची पूर्तता कारागृह प्रशासक आणि कर्मचारी करत आहेत. सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात डिसेंबर २०२३ मध्ये पहिला वर्ग सुरू झाला. टप्प्याटप्प्याने यात कोल्हापूर, नाशिक, ठाणे, तळोजा येथील केंद्रीय कारागृहांना समाविष्ट केले गेले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात २५, ठाणे ३५, कोल्हापूर ४५, नाशिक ४०, तळोजा ३५, येरवडा १० कैद्यांचा समावेश आहे. या कारागृहातील सुमारे १९० बंदी साधक गीता श्लोक पठण करीत आहेत.

प्रत्येक अध्यायाचे अर्थ विवेचन सुद्धा ऑनलाईन माध्यमातून केले जात आहे. सध्या ठाणे, नाशिक, कोल्हापूर आणि तळोजा येथील कारागृहांमध्ये तिसऱ्या टप्प्यांचे प्रशिक्षण पूर्ण होत आले आहे. येथे एकूण १२ अध्यायांचे प्रशिक्षण पूर्ण होत आहे. गीता परिवाराकडून सरळ पठणीय गीतेची पुस्तके साधकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कारागृह अधिकारी आणि साधक या उपक्रमाबाबत समाधानी आहेत. याबरोबरच येरवडा महिला कारागृहामध्ये प्रत्यक्ष वर्ग घेण्यात आले. पुरुष बंदी बांधवांकरिता रविवारी उद्बोधनपर व्याख्याने घेतली जात आहेत.

शनिवारी व रविवारी शिकलेल्या श्लोकांचे विवेचन केले जाते. गीता परिवाराचे हे वर्ग चार टप्प्यांमध्ये चालत आहेत. या चार टप्प्यातील वर्गांना चार स्तर म्हटले जाते. पहिल्या स्तरावर दोन अध्याय शिकवले जातात. दुसऱ्या स्तरामध्ये चार अध्याय शिकवले जातात. तिसऱ्या आणि चौथ्या स्तरमध्ये प्रत्येकी सहा अध्याय शिकवले जातात. या उपक्रमामुळे बंदीजनांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हा उपक्रम निश्चितच बंदीजनांना नव्या आयुष्याच्या वळणावर आणण्यास यशस्वी होत आहे. अशा उपक्रमांमुळे बंदीजन आपल्या कुटुंबात परत येवून एक चांगले आयुष्य जगू शकणार आहेत, असा विश्वास कारागृह प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## दुखवटा

### रोहित मांडे



**कर्जत :** शहरातील रहिवासी असलेले सध्या नोकरीनिमित्त पुणे येथे वास्तव्यास असलेले रोहित नंदकुमार मांडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी ते ३८ वर्षांचे होते. पत्रकार विजय मांडे यांचे ते पुतणे होते. त्यांच्या पश्चात आई पत्नी, मुलगी, भाऊ असा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार दहिवली – कर्जत येथील स्मशानभूमीत करण्यात आले.

# फसवणूक, चोऱ्यांचे प्रमाण वाढले

## हातचलाखीने एटीएम बदलून ४० हजारांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हातचलाखीने एटीएमची बदली करून त्याद्वारे चाळीस हजार रुपये काढून घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

बतुल चौगुले हा तळोजा फेज टू येथे राहत असून तो एटीएम घेऊन बँकेच्या एटीएम मध्ये गेला. त्या ठिकाणी एटीएमचे एक मशीन होते. तो आत गेल्यानंतर एक अनोळखी व्यक्तीदेखील एटीएमच्या आत आला आणि बतुल पैसे काढण्याचा प्रयत्न करत होता, मात्र पैसे निघत नव्हते. या वेळी अनोळखी व्यक्तीने मी ट्राय करतो असे बोलून एटीएम कार्डमशीनमधून काढले आणि पुन्हा टाकल्यानंतर पिन टाकून पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे आले नाहीत.

काही वेळानंतर त्याने एटीएम कार्ड परत केले आणि तो निघून गेला. बतुल घरी पोहोचला असता त्याच्या एटीएम मधून चाळीस हजार रुपये काढल्याचा मेसेज आला. अनोळखी ईसमाने त्यांची फसवणूक केली.

## नऊ लाख ७० हजारांची फसवणूक करणारा गजाआड

**पनवेल :** गाडी खरेदी करण्याकरिता ग्राहकाकडून रक्कम घेवून सदर रक्कम शो रुममध्ये जमा न करता त्या रक्कमेच्या शोरुमच्या नावाने बनावट रिसीट बनवून व आलेली रक्कम ऑनलाईन जुगार खेळून खर्च केल्याप्रकरणी जवळपास नऊ लाख ७० हजारांची फसवणूक झाल्याची घटना एका ग्राहकाची घडली होती. या प्रकरणी एका आरोपीस अटक केली आहे.

स्वप्नील क्षिरसागर यांनी गारनेट मोटर्स पनवेल या स्कोडा कारच्या शोरुममध्ये सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून काम पाहणारा सागर चव्हाण याला स्कोडा कुशाक गाडी खरेदीकरिता जवळपास नऊ लाख ७० हजार ६९९ रुपये देण्यात आले होते. ही रक्कम त्याने शो रुममध्ये जमा न करता त्या रक्कमेच्या शोरुमच्या नावाने बनावट रिसीट बनवून व आलेली रक्कम ऑनलाईन जुगार खेळून खर्च केल्याप्रकरणी जवळपास नऊ लाख ७० हजाराची फसवणूक झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. या प्रकरणी आरोपी सागर चव्हाण याला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## लोखंडी पाईप चोरले

**पनवेल :** कंपनीच्या आवारात ठेवलेल्या एसएसच्या लोखंडी पाईपची चोरी झाल्याची घटना तळोजा येथील निश्रा ओव्हरसीस एलएलपी, धुरव लॉजिस्टिक पार्क तळोजा येथे घडल्याचे उघड झाले आहे. या लोखंडी पाईपची किंमत जवळपास कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चार मेट्रिक टन गव्हाची चोरी

**पनवेल :** तळोजा येथील रोहिंजन गावाजवळील अदानी एग्रो लॉजिस्टिक गोदामातून गहूची वाहतूक करणाऱ्या चालकाने तब्बल ४ मेट्रिक टन गहू चोरी केला. चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रोहिंजन गावाजवळ अदानी एग्रो लॉजिस्टिक पार्क गोदाम आहे. या गोदामामध्ये क्रिएटिव्ह ग्रेन्स ट्रान्सपोर्टेशन या कंपनीकडे गहू वाहतुकीचा ठेका आहे. २४ मार्चला अनिल कुमार हा गोदामामधून ५० किलो वजनाच्या ४४० पोती गहू घेऊन निघाला, परंतु अनिल कुमार याने त्याचा ट्रक कामोठे येथील हावरे सोसायटीसमोरील विनोद भगत यांच्या वाहनतळात उभा करून निघून गेला. ट्रकमधील मालाची तपासणी केल्यावर त्यात ३,९५० किलो ग्रॅम गव्हाचा साठा कमी आढळल्याने क्रिएटिव्ह ग्रेन्स कंपनीच्या वतीने व्यवस्थापक रामकुमार यादव यांनी एक लाख ३० हजार रुपये किमतीच्या गव्हाचा अपहार झाल्याची तक्रार तळोजा पोलिसांत नोंदवली.

# विद्यालय परिसरातील रस्ता दुरूस्त करण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ६मध्ये सिडकोने रस्ता खोदून केबल टाकण्याचे काम लवकर पूर्ण करावे, जेणेकरून पनवेल मनपा खड्डेमय रस्ता दुरुस्त करू शकेल, अशा मागणीचे पत्र भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांनी सिडकोला दिले आहे.



खारघर सेक्टर ६ मधील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यातून नागरिकांना ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात असलेल्या कॉन्व्हेंट ऑफ जेसस अँड मेरी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज प्रशासनाने पालिका आयुक्तांना पत्र लिहून येथील समस्यांची व्यथा मांडली आहे.

रस्त्यांसह पदपथांची दुरवस्था धोकादायक झाडांच्या फांद्या वाढलेल्या असल्याचे प्राचार्यांनी महानगरपालिका आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. विद्यार्थी, त्यांना सोडण्यासाठी येणारे पालकदेखील यामुळे त्रस्त झाले असून, शाळा प्रशासनाकडे तक्रार करीत आहेत. या परिस्थितीमुळे कोणत्याही क्षणी या ठिकाणी अपघात होऊ शकतो. त्यामुळे लवकरात लवकर येथील अर्धवट कामे मार्गी लावण्याची गरज आहे. पूर्वी येथील रस्ता सिडकोच्या अखत्यारीत होता. काही महिन्यांपूर्वी तो नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

पालिकेमार्फत या रस्त्याच्या कामाकरिता कंत्राटदारदेखील नेमला आहे, मात्र या नियोजित रस्त्यात सिडको एक काम हाती घेणार आहे. त्याकरिता रस्ता खोदून केबल टाकली जाणार आहे. त्यामुळे पालिकेने हे काम थांबवले आहे. सिडकोने संबंधित काम पूर्ण केल्यास त्वरित रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल, असे पनवेल मनपाचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी सांगितले.

त्यानुसार कॉन्व्हेंट ऑफ जेसस अँड मेरी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज प्रशासनाने आमदार प्रशांत ठाकूर व भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांच्याकडे सिडकोला अर्धवट कामे पूर्ण करण्याबाबत सांगण्याची मागणी केली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेत ब्रिजेश पटेल यांनी सिडको अभियंत्यांकडे पत्रव्यवहार केला आहे.

दरम्यान, कॉन्व्हेंट ऑफ जेसस अँड मेरी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज प्रशासनाने शाळेच्या आवाराबाहेरील झाडे छाटण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांना पत्राद्वारे केली होती. त्यानुसार भाजप पदाधिकाऱ्यांनी तत्काळ धोकादायक झाडांच्या फांद्या छाटून घेतल्या.

# सिडकोच्या द्रोणागिरी अग्निशमन केंद्राचे दूरध्वनी क्रमांक जाहीर

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या द्रोणागिरी अग्निशमन केंद्राकडे अत्यावश्यक सेवेसाठी मदत मागण्याकरिता द्रोणागिरी परिक्षेत्रातील रहिवशांकरिता सध्या ०२२-२७२२२१३८ हा एमएटीएनएल दूरध्वनी क्रमांक उपलब्ध असून द्रोणागिरी परिक्षेत्रात अग्निशमन व अन्य अत्यावश्यक सेवांकरिता द्रोणागिरी परिसरातील नागरिक याच क्रमांकांवर संपर्क साधतात.

सध्या ०२२-२७२२२१३८ हा एमटीएनएल क्रमांक बंद असल्याचे एमटीएनएलतर्फे कळविण्यात आले आहे. यामुळे या क्रमांकावर कॉल केला असता केवळ रिंग होते, परंतु दूरध्वनी क्रमांक बंद असल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. याकरिता द्रोणागिरी परिसरातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सिडकोतर्फे ०२२-६९३६५६०० या नवीन एमएटीएनएल दूरध्वनी क्रमांकासह ८१०४९६१९४१ हा भ्रमणध्वनी क्रमांकदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या क्रमांकांवर संपर्क साधून द्रोणागिरी परिसरातील नागरिकांनी अग्निशमन किंवा अत्यावश्यक सेवांकरिता मदत मागावी, असे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे.



**पनवेल : चिंध्रणमध्ये पुरातन श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा जीर्णोद्धार आणि मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्या अंतर्गत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका खजिनदार शिवाजी दुर्गे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य एकनाथ देशेकर, सरपंच एकनाथ पाटील, नरेश सोनावळे, गणपत कडू, अनंता कडू, लक्ष्मण कडू, भगवाण कडू, जगन्नाथ पाटील, दिनेश पाडेकर, कुंडलिक देशेकर, बबन फराड आदी उपस्थित होते.**

# महावीर जन्म कल्याणकनिमित्त कत्तलखाने, मांस विक्री बंद ठेवा

## जैन समाजाची पनवेल मनपाकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शाखेने भगवान महावीर जन्म कल्याणकनिमित्त कत्तल आणि मांस विक्री थांबवण्यासाठी पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले. आयुक्तांनी ही विनंती सकारात्मकतेने घेतली.

आमदार प्रशांत ठाकूर विशेष उपस्थित होते. त्यांच्यासह अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघ पनवेलचे अध्यक्ष विनोद बाफना, मंत्री राकेश कंठेड, उपाध्यक्ष मोतीलाल जैन, सहमंत्री संजय जैन, शिव देवदा, कोषाध्यक्ष महेंद्र कुकडा, संरक्षक नितीन मुनोत, चतरलाल मेहता, रोशन लाल इंदोदिया, दिनेश चौधरी, कार्यकारी सदस्य उमेश कुम्मठ आदी पनवेल जैन संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.







**पनवेल : ॲड. स्वप्नील जाधव यांच्या कार्यालयाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ तसेच बाजीराव चव्हाण, डॉ. व्यंकट जाधव, डॉ. अमित पाटील, डॉ. स्वप्नील लोखंडे, ॲड. भूषण म्हात्रे, ॲड. संदीप घोगरे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : श्री सोमेश्वर एकविरा पालखी उत्सवांतर्गत पापडीचा पाडा ते कार्ला या पदयात्रेचा प्रारंभ झाला आहे. या सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहभागी होत एकविरा आईचे मनोभावे दर्शन घेतले. श्री सोमेश्वर एकविरा आई पालखी पदयात्रा मित्र मंडळातर्फे ३ ते ५ एप्रिलदरम्यान या पदयात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, प्रभाग ३चेअध्यक्ष जगदीश घरत, भाजप नेते विनोद घरत, जयवंत घरत, रवी घरत, हरिश्चंद्र जोशी, कैलास घरत, युवा मोर्चा अध्यक्ष विशाल घरत, मंडळाचे अध्यक्ष सदानंद जोशी, उपाध्यक्ष सतीश घरत, सचिव बबलू जोशी, खजिनदार मुकेश घरत, सहसचिव कल्पेश घरत, शुभ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.**

# तनया गंभीरे हिला एनएमएमएस शिष्यवृत्ती

**उलवे : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी तनया प्रमोद गंभीरे हिने एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये यश संपादन करून एनएमएमएस ही शासकीय शिष्यवृत्ती मिळविली आहे.

एनएमएमएस शिष्यवृत्ती मिळवून विद्यालयाचा नावलौकिक वाढवल्याबद्दल तिचा सत्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.डी.भर्णुके व सर्व शिक्षक वर्गाने केला.

या परीक्षेसाठी तिला मार्गदर्शन करणाऱ्या एन एम एम एस विभागाच्या विभाग प्रमुख वेदांगी म्हात्रे तसेच इतर सर्व विषय शिक्षकांचे मुख्याध्यापक डी. डी. भर्णुके यांनी अभिनंदन केले.



# कोळखे गावातील सार्वजनिक शौचालय परिसर स्वच्छ करा / भाजप पदाधिकारी नासिर शेख यांची मागणी; ग्रामपंचायतीकडे पत्रव्यवहार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोळखे ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे गेल्या तीन महिन्यांपासून सार्वजनिक शौचालय व टाकी साफसफाईसंबंधी कार्यवाही करण्याची मागणी भाजप पदाधिकारी व ग्रामपंचायत सदस्य नासिर शेख यांनी पत्रव्यवहार केला. त्यानुसार सफाई झाली, मात्र घाण शौचालयाच्या बाजूलाच ठेवण्यात आली. त्यामुळे लवकरात लवकर ही घाण उचलून परिसर स्वच्छ करावा, असे शेख यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

शेख यांनी पत्रात म्हटले आहे की, ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक शौचालय आणि सांडपाण्याच्या टाकीची मागील चार महिन्यांपासून साफसफाई झालेली नाही. मी व ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. विशेष म्हणजे रमजान महिन्याच्या आधी स्वच्छतेची मागणी करूनही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले आहे, त्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

ग्रामपंचायतीने गावातील स्वच्छता राखण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे, परंतु शौचालय व सांडपाण्याच्या टाकीची स्वच्छता केलेली नाही. ग्रामपंचायतीने नागरिकांच्या आरोग्य आणि स्वच्छतेसाठी आवश्यक ती पावले उचलली पाहिजेत, मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. ग्रामसेवक व इतर अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडली नाहीत, म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.

आपले सरकार पोर्टरवरही तक्रार दाखल केली. याची पनवेल पंचायत समिती कार्यालयाने दखल घेत कोळखे अंतर्गत पारपुंड येथील शौचालयाच्या टाक्या साफ करण्यात आल्या परंतु ती घाण थेट शौचालयाच्या बाजूला टाकली, ज्यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच शौचालयाच्या टाकीचे झाकण पूर्णपणे तोडलेले असून त्यावर लाकडी फळी ठेवलेली आहे. जर एखादा लहान मुलगा शौचालयात गेला आणि त्या टाकीत पडला, तर त्याचा जीव धोक्यात येईल. ही अत्यंत गंभीर आणि धोकादायक बाब आहे, असे शेख यांनी म्हटले आहे.

सार्वजनिक शौचालयाची तातडीने पूर्ण स्वच्छता करून निर्जंतुक फवारणी करावी. सांडपाण्याची टाकी योग्य प्रकारे साफ करून, त्यातील घाण शौचालयाशेजारी न टाकता सुरक्षितरीत्या विल्हेवाट लावावी. ग्रामसेवक व जबाबदार अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाची चौकशी करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. ग्रामपंचायतीने वारंवार तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत जबाबदार अधिकारी, सरपंच व सदस्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, असे शेख यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

# सवलतींची भुरळ नको

स्वस्तात जवळपासची परदेशवारी करण्याचे स्वप्न अनेक सामान्य कुटुंबे बाळगून असतात. परंतु समाजमाध्यमांवरून असे बुकिंग केल्यास अवघा व्यवहार बोगस निघाल्याचा अनुभव काही जणांना आला आहे. चारधाम वा केदारनाथ यात्रेच्या नावाखालीही काही जणांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे सध्याच्या उन्हाळी सुटीच्या काळात सवलतींच्या वा कमी दरातील तिकीट, बुकिंग आदींच्या प्रलोभनांना बळी पडताना सावधगिरी बाळगणे अतिशय आवश्यक झाले आहे.

**सामान्यातल्या सामान्य माणसालाही आता स्मार्ट फोनचा आणि पर्यायाने त्यावरील तंत्रज्ञानाचा वापर करण्यावाचून पर्याय नाही. अगदी अशिक्षित वा अल्पशिक्षित भाजी विक्रेत्यांपासून रिक्षाचालकांपर्यंत हरतऱ्हेच्या सर्व स्तरांतील व्यावसायिकांना आणि सामान्यांना ऑनलाइन व्यवहार करणे भाग पडते. अनेकदा तुटपुंज्या माहितीच्या आधारेच हा वापर होत असतो. तीच गोष्ट सोशल मीडियाची. फोनवर विविध ॲप मोफत उपलब्ध आहेत म्हटल्यावर ती डाऊनलोड केली जातात. आणि अंदाजपंचे त्यांचा वापरही होतो. वेगवेगळ्या साइट्सकडून कमी किंमतीत वस्तू, किराणासामान, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू आदींची जाहिरात सुरूच असते. फेसबुक, इन्स्टाग्रामवरही जाहिरातबाजी सुरूच असते. हवीहवीशी वाटणारी वस्तू कमी किंमतीत उपलब्ध दिसली की भुरळ पडतेच, तशीच फारशी गरजेची नसलेली वस्तूही अल्प किंमतीत उपलब्ध दिसली की घ्यावीशी वाटते. याच साऱ्या मोहजाळाला बळी पडून अनेक जण पुरेशी खबरदारी न घेता ऑनलाइन व्यवहार करतात आणि कधीकधी त्यांच्यावर पश्चातापाची पाळी येते. तूर्तास उन्हाळी सुट्यांना सुरूवात झाली असल्याने अनेक जण ऑनलाइन बुकिंगचा शोध घेत असतात. एकदा का तुम्ही कुठल्याही साइटवर एखादे ठिकाण सर्च केले की तुम्हाला सगळीकडेच संबंधित जाहिराती दिसू लागतात. कधी–कधी तर सर्च करण्याचीही गरज भासत नाही. घरी आपापसात अशा बाबींची चर्चा केल्यावरही संबंधित जाहिराती दिसू लागतात असा अनुभव अनेकांना येतो. आपला फोन आपले बोलणे ऐकतो का, असा प्रश्न अनेकांना पडतो आणि त्यावर उपाय म्हणून कुठल्या–कुठल्या ॲपला आपल्याकडून मायक्रोफोन ॲक्सेस दिला गेला आहे ते तपासण्याचा सल्ला दिला जातो. पण फोनचा वापर पूर्णत्वाने करायचा असेल तर असा ॲक्सेस द्यावाच लागतो हेही कालांतराने लक्षात येते. तर सध्या अनेकांना अशाच कुठल्यातरी बेसावध वापरातून सुटीच्या बुकिंगच्या जाहिराती दिसू लागतात. विमानाची तिकिटे, रिसॉर्ट बुकिंग यांचे स्वस्त पर्याय दिसतात. विशेषत: सोशल मीडियावर सवलतीच्या दरात सुटीचे संपूर्ण बुकिंग करून देण्याच्या जाहिराती दिसतात. परंतु अशा कुठल्याही जाहिरातीमधील लिंकवर क्लिक करणे महागात पडू शकते. यातून फसवणूक पदरात पडल्याचा अनुभव काही जणांना आल्याचे दिसते आहे. एक तर यातून हॅकर्सना तुमच्या बँकखात्याचा थेट क्सेस मिळतो किंवा तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची नाव, पत्ता, फोन क्रमांक आदी माहिती बोगस साइटवर नोंदवून बसता. या मार्गाने काही जणांची फसवणूक झाल्याच्या घटना उघडकीला आल्या आहेत. त्यामुळेच एखाद्या साइटच्या विश्वासार्हतेची खातरजमा केल्याशिवाय असे बुकिंग करणे टाळायला हवे. नामवंत किंवा ओळखीच्या कंपन्या थोडे जास्त पैसे घेत असतील, परंतु किमान तेथे फसवणूक न होण्याची खात्री असते. एकंदरच अलीकडच्या काळात व्हॉट्सप, फेसबुक हॅकिंगचे प्रकार खूपच वाढले आहेत. त्यामुळे कुठल्याही अनोळखी लिंकवर क्लिक करणे, अनोळखी साइट्सवरून आर्थिक व्यवहार वा बुकिंग करणे टाळणे गरजेचे झाले आहे.**

# रायगडात जलस्त्रोतांचे बळकटीकरण व्हायला हवे!





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालली आहे. एकीकडे गावागावंमधील पाणीपुरवठा योजना बारगळत चालल्या असताना जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा कमी होत आहे. धरणांना गळती लागली आहे. त्यामुळे पाणी टिकून राहात नाही. राजयगड जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतीमधील २८ धरणे आहेत. या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. सध्या एप्रिल महिना सुरू आहे. आणा या धरणांमध्ये ४३.९९ टक्के इतकाच पाणीसाठा आहे.  या पाण्यावर पुढील अडीच महिने कसे काढायचे आहेत. त्यामुळे पाण्याचे नियोजन कसे करावे आस प्रश्न प्रशासनासमोर आहे. भविष्याचा विचार करता जुन्या धरणांची दरुस्ती करायला हवी.  त्याचबरोबर पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण , पुर्नभरण या सारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

जिल्हयात दरवर्षी सरासरी तीन हजार मिलीमीटर इतका पाऊस बरसतो. तरी देखील जिल्ह्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाई भासते. वर्षी टॅकरने पाणीपुरवठा करण्यासाठी करोडो रूपये खर्च केले जातात. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. रायगड जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात यंदा चांगला पाऊस झाला. धरणे शंभर टक्के भरल्याने पाणीटंचाईचे संकट दूर झाल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत होता. परंतु, मार्च महिना संपताच  धरणामधील पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे.  लघुपाटबंधारे विभागाच्या जिल्हयातील २८ धरणातील पाणीसाठा निम्म्याहून कमी झाला आहे आता केवळ ४३.९९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे या वर्षीही पाणीटंचाईच्या झळा जिल्ह्याला बसणार आहेत.  जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी यंदा देखील ५ कोटी ६२ लाख ६८ हजार रुपयांचा पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात १ हजार १६ गावे व वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. आराखड्यात विहिरी खोल करणे गाळ काढणे या कामासाठी  ६० लाख १८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर टँकर, बैलगाडीने पाणी पुरवठा करणे ३ कोटी ५२ लाख ९२ हजार, नविन विंधन विहिरी १ कोटी ३ लाख ६८ हजार, विंधन विहिरींची दुरुस्ती ४५ लाख ९० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील मुरूडमध्ये १तळा १, रोहा १, पेण १, अलिबाग १, सुधागड ५, श्रीवर्धन ३, म्हसळा २, महाड ४, कर्जत २, खालापूर ३ , पनवेल ३ , उरण १ अशी १३ तालुक्यांत २८ लघुपाटबंधारे विभागाचे प्रकल्प आहेत. यामधून जिल्ह्यातील नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येतो. जिल्ह्यातील या धरणांमध्ये ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. या धारणांची पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली आहे.  अनेक धरणे ही ३० ते ४० वर्षापूर्वी बांधण्यात आली आहेत. मातीने बांधण्यात आलेल्या या धरणांना गळती लागली आहे. ही गळती थांबवली पाहिजे. धरणे गाळाने भरली आहेत. या धरणांमधील गाळ काढून त्याचीं पाणी साठा करण्याची क्षमता वाढवली पाहिजे.  प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्ती कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. गळतीमुळे पाणीसाठा कमी होत असून उन्हाळ्यात पाणीटंचाई उद्भवण्याची शक्यता आहे.

२०१५ साली रायगड जिल्ह्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी लोकसहभागातून जिल्ह्यात तलाव, धरणातील गाळ काढून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण करण्याची मोहीम  राबविण्यात आली होती .  या मोहिमेत गाळ काढण्यात आलेल्या ३२ जलसाठयामध्ये ५०२.७७ टी.सी.एम. इतकी पाणीसाठवण क्षमता वाढ निर्माण झाली होती.या मोहोमेत  गाळ काढून तो शेत जमीन व शेतकर्यांच्या शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपिकता वाढली. मृदसंधारणात वाढ झाली.  गुरांना पिण्याच्या पाण्याची सोय निर्माण झाली तसेच शेतकऱ्यांना भाजीपाला लागवड करणे शक्य झाले होते.

पिण्याचे पाण्याचे स्त्रोताचे  बळकटीकरण करणे. अस्तित्वात असलेले व निकामी झालेले सिमेंट बंधारे, माती बंधारे, गाव तलाव,पाझर तलाव या जलयुक्त स्त्रोताची पाणी साठवण क्षमता पुन:स्थापित करणे.  जलस्त्रोताचा पाणीसाठा वाढविणे.  पाण्याच्या वापराबाबत जनतेत जाणीव व जागृती निर्माण करणे आशी मोहिम रायगड जिल्ह्यात  राबवावी लागेल.

केवळ प्रशासनानेच प्रयत्न केले पाहिजेत असे नाही. नागरीकांनी देखील पुढाकार घेतला पाहिजे. पाण्याचा  अपव्यय टाळणे , पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतां व्यतिरिक्त परिसरातील इतर उपलब्ध स्त्रोतांमधील पाण्याचा दैनंदिन वापरासाठी वापर कर केल्यास पाण्याची बाच होऊ शकते.पाणी उपसा होतो परंतु  स्त्रोतांचे पुनर्भरण होत नाही. जिल्ह्यात भरपूर  पाऊस पडतो. हे पावसाचे पाणी  नदी , अनाल्यातून समुद्राला जावून मिळते . हे पाणी अडवून ते जमिनीत जिरवले पाहिजे. विहीरी आणि विंधण विहीरींचे पुर्नभरण या सारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# स्टेटसवर आता गाणे जोडा, व्हॉट्सॲपचे नवे फिचर

सध्याच्या चालू पिढीला सर्व काही सोशल मीडियावर दाखवून करायचे असतो. सोशल मीडियाच्या स्पर्धे तेमध्ये टिकून राहण्यासाठी प्रत्येक सोशलमीडिया प सातत्याने नवे फिचर आणून युजरला काही तरी नवीन देत असते. युजरला आपल्याकडे आकर्षित करुन घेतले जाते. त्यामध्येच आता व्हाट्सप आपल्या युजरसाठी आता नवीन फिचर घेऊन आले आहे. पहिल व्हाट्सपने इन्स्टाग्रामप्रमाणे मित्र– मैत्रिणीला टॅग करण्याचे फिचर आणले होते. आता पुन्हा काहीतरी व्हाट्सप नवीन घेऊन आले आहे. काय आहे फीचर जाणून घेऊ या...




**नवे फिचर कसे डाऊनलोड करायचे**

सर्वप्रथम व्हाट्सप प गुगुल प्ले स्टोअरमध्ये जाऊन अपडेट करा. त्यानंतर तुमच्या व्हाट्सपवर फेसबुक , इन्स्टाग्रामप्रमाणे म्युझिक आयकॉन दिसू लागेल . त्यानंतर तुम्ही तुमच्या आवडीचा फोटो टाकून त्यावर आवडीचे गाणे सेट करु शकता. त्याचप्रमाणे स्टेटसच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यात  हे चिन्ह दिसेल. त्यावर क्लिक केल्यावर तुम्हाला मित्र– मैत्रिणीला टॅग करता येईल. त्यामुळे आता व्हाट्सप इन्स्टाग्रामप्रमाणे काम करणार आहे.

**व्हॉट्सॲपचा स्टेट्स हाईड...**

बहुतेकवेळा आपल्या मनातील भावना काही नेमंका लोकांना सांगायच्या असतात. त्यावेळेस काय करावे हे समजत नाही. तेव्हा स्टेट्सच्या वरच्या बाजूला असलेल्या तीन डॉटवर क्लिक करा. नंतर ज्या व्यक्तींना तुम्हाला हाईड करायचे आहे. त्यांच्या नावावर क्लिक करुन त्यांना हाईड करा. त्यामुळे हाईट केलेल्या व्यक्तींना तुमचा स्टेटस दिसणार नाही.

अनेकवेळा कामाच्या ठिकाणी आपण व्हाट्सप लॉगिन करतो. त्यावेळेस आपली संपुर्ण चॅटलिस्ट समोर दिसते. अशावेळेस तुम्ही तुमचे वैयक्तिक चॅट लपवू शकतात. कसं ते जाणून घ्या...

सर्वप्रथम व्हाट्सप प गुगुल प्ले स्टोअरमध्ये जाऊन अपडेट करा. त्यानंतर तुमच्या व्हाट्सॲपवर नवीन फीचर येईल. ज्या व्यक्तीला हाईट करायचे आहे. त्याच्या नावावर क्लिक करुन तुम्हाला चॅट लॉकचा ऑप्शन येईल. त्यानंतर विशिष्ट कोड लावून लॉक करु शकतात. त्यामुळे तुमच्या चॅटलिस्टमध्ये त्या व्यक्तीचे नाव दिसणार नाही

# साहित्यिक डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे



**निमित्त**

पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे श्रेष्ठ विचारवंत, निबंधकार व कथालेखक डॉक्टर पु. ग. तथा पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे यांचा जन्म १० जुलै १९०४ रोजी पुणे येथे झाला. ४ १९२४ मध्ये ते मॅट्रिक झाले. याच वर्षी त्यांचा प्रा. श्री.म. तथा बापूसाहेब माटे यांच्याशी परिचय झाला; तो त्यांच्या आयुष्याला वळण लावणारा, संस्कार करणारा ठरला. १९२८ मध्ये स.प. महाविद्यालयातून त्यांनी बीएची पदवी प्राप्त केली व ते नूतन मराठी विद्यालयात शिक्षक म्हणून काम करू लागले. १९२९मध्ये वि. कृ. दातार यांच्या भगिनी द्वारकाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. १९३१ मध्ये त्यांनी एम.ए.ची पदवी प्राप्त केली.

१९२८ ते १९६४ या कालखंडात त्यांनी प्रथम विद्यालयात शिक्षक म्हणून व नंतर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. मराठी साहित्याबरोबरच इतिहास, धर्म, संस्कृत, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र इ. विषयांचा त्यांचा मोठा व्यासंग होता. एक शिक्षक म्हणून, सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर बुद्धिवादाचे, ज्ञाननिष्ठेचे व राष्ट्रभक्तीचे संस्कार करावे ही त्यांच्या लेखनामागची एक प्रबळ प्रेरणा होती.१ त्यांचे बरेचसे ग्रंथलेखन, निबंध व प्रबंधांच्या स्वरूपाचे आहे.२ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बौद्धिक प्रमुख म्हणून त्यांनी अनेक व्याख्याने दिली.

१९३१मध्ये सहस्त्रबुद्धे यांनी 'किर्लोस्कर' मासिकातून कथालेखनाला आरंभ केला. १९३४ मध्ये त्यांच्या 'लपलेले खडक' या लघुकथासंग्रहाचे प्रकाशन झाले. १९३३ मध्ये त्यांचे पहिले नाटक 'सत्याचे वाली' हे प्रसिद्ध झाले आणि दुसरे नाटक 'वधू संशोधन' १९३७मध्ये प्रसिद्ध झाले. मात्र त्यांचे प्रयोग झाल्याचे उल्लेख नाहीत. १९३६ मध्ये त्यांचा 'विज्ञानप्रणीत समाजरचना' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. आधुनिक काळासाठी योग्य अशा विज्ञाननिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य विवेकनिष्ठा, विज्ञाननिष्ठा व बुद्धिस्वातंत्र्य या मूल्यांवर आधारित नव्या समाजरचनेचे चित्र यासाठी आवश्यक ते बदल करण्याची गरज. या ग्रंथाचे अभ्यासकांत स्वागत झाले. शिवाय त्यास भोरचे 'शंकराजी नारायण' हे पारितोषिकही मिळाले.

१९३९मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे पहिले पीएच.डी. झाले. १८५८ ते १९३८ या काळातील मराठी ललित साहित्यातील 'स्वभावलेखन' या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला. साहित्यसम्राट न.चिं. केळकर हे त्यांचे मार्गदर्शक होते, तर वा.म. जोशी हे परीक्षक होते

'भारताचा उत्कर्ष' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी ललित लेखनाकडे पाठ फिरवली आणि आपल्या समाजाचा, तसेच समाजशास्त्राचा, राजकारणाचा अभ्यास सुरू केला. १९३९ ते १९४३ या काळात ते केवळ अभ्यास, मनन आणि चिंतन करत होते. अनेक विषयांच्या व्यासंगातून आणि चिंतनातून काढलेले निष्कर्ष समाजापुढे निर्भयपणे मांडण्याच्या हेतूने त्यांनी लेखन केले आणि मराठीतील विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो.टिळक, गो.ग.आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर शं.द. जावडेकर, श्री.म. माटे यांसारख्या निबंधकारांची परंपरा चालू ठेवली व समृद्ध केली.

१९२८ ते १९४६ पर्यंत त्यांनी पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात शिक्षक म्हणून काम केले एक शिक्षक म्हणून, सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर बुद्धिवादाचे, ज्ञाननिष्ठेचे व राष्ट्रभक्तीचे संस्कार करावे ही त्यांच्या लेखनामागची एक प्रबळ प्रेरणा होती. ४ मार्च १९८५ रोजी त्यांचं निधन झालं. (साभार : इंटरनेट)

**बातमीतील बात**




## आरोग्य प्रहर

# उष्माघातापासून संरक्षण करतो ऊसाचा रस!

उन्हाळ्यात तुमच्या आजूबाजूला ऊसाचा रस विकतांना तुम्ही पाहिलेच असेल. कडक उन्हापासून आणि उष्माघातापासून वाचण्यासाठी लोक ते भरपूर पितात. हे फक्त चविष्टच नाही, तर आरोग्यासाठी खूप फायदेशीर देखील आहे. हे शरीराला हायड्रेटेड ठेवते आणि ऊर्जावान देखील ठेवते. याशिवाय, ऊसाचा रस पचनसंस्था सुधारण्यासाठी, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि त्वचा निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. त्यात अनेक आवश्यक पोषक घटक आढळतात.



फार्माकोग्नोसी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, ऊसाच्या रसाचे अनेक आरोग्य फायदे आहेत. आयुर्वेद आणि युनानी पद्धतीमध्ये कावीळ आणि लघवीशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी ऊसाचा रस पिण्याचा सल्ला दिला जातो. त्यात जीवनसत्त्वे आणि खनिजांचा खजिना आहे.ऊसाच्या रसात असलेले व्हिटॅमिन सी आणि फ्लेव्होनॉइड्स आणि फिनॉलिक्स सारखे अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. हे एक उत्तम हायड्रेटिंग पेय आहे, कारण त्यात भरपूर पाणी असते. ऊसाच्या रसामध्ये नैसर्गिक साखर, फायबर आणि इन्व्हर्टेजसारखे एंजाइम असतात, जे पचनसंस्था मजबूत करतात. ऊस हा सुक्रोज आणि ग्लुकोज सारख्या कार्बोहायड्रेट्सचा नैसर्गिक स्त्रोत आहे, जो त्वरित ऊर्जा प्रदान करतो.

ऊसाचे मूत्रवर्धक गुणधर्म शरीरातील विषारी पदार्थ मूत्राद्वारे बाहेर काढण्यास मदत करतात. ऊसामध्ये अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे तोंडाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. यामध्ये असलेले कॅल्शियम दात आणि हाडे मजबूत करते. यामध्ये आढळणारे अँटीऑक्सिडंट्स त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे सुरकुत्या, बारीक रेषा आणि त्वचेवरील डाग यांसारखी वृद्धत्वाची लक्षणे कमी करतात. तर पॉलीफेनॉल आणि पोटॅशियम सारखे संयुगे हृदयरोगापासून संरक्षण करतात.

ऊसाचे दाहक–विरोधी गुणधर्म रक्तवाहिन्यांमधील जळजळ आणि कोलेस्टेरॉलची पातळी कमी करून हृदयाचे आरोग्य सुधारतात. त्याचा रस केवळ शरीराचे तापमान नियंत्रित करत नाही, तर इलेक्ट्रोलाइट देखील संतुलित करतो. अशाप्रकारे ते उन्हाळ्यात उष्माघाताच्या धोक्यापासून आपले संरक्षण करते.

# महाड एमआयडीसी कंपनीला आग; गोदाम जळून खाक

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीमधील एका रासायनिक कंपनीच्या गोदामाला गुरुवारी (दि. ३) दुपारी भीषण आग लागली. या आगीमध्ये कंपनीतील साठा केलेले सर्व रसायन तसेच कंपनीचा प्लांट जळून खाक झाला.

महाड एमआयडीसीमधील अतिरिक्त औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नंबर एल ३५/३६मध्ये असलेल्या एका स्मॉलस्केल इंडस्ट्रीच्या गोदामाला गुरुवारी दुपारी भीषण आग लागली. आगीच्या लोटामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये धुराचे लोट पसरले. त्याचप्रमाणे कंपनीच्या गोदामामध्ये ठेवण्यात आलेले रासायनिक ड्रम आगीमुळे उष्णता वाढून स्फोट होऊन फुटू लागले. या आवाजामुळे शेजारी असलेल्या कंपन्यांमधील कामगारदेखील भयभीत झाले.

एमआयडीसी अग्निशमन दल, तसेच महाड नगरपरिषद यांच्या अग्निशमन दलाच्या गाड्या आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. शिवाय मोठ्या प्रमाणात फोमचादेखील वापर करण्यात आला. सायंकाळी साडेसहा सात वाजण्याच्या याच वेळी अवकाळी पाऊस आल्याने आगीवर नियंत्रण मिळवण सोपे झाले.



ताज्या बातम्या, आकर्षक जाहिरातीसाठी 'रामप्रहर'

## वाहने विक्री जाहीर लिलाव सुचना

महात्मा फुले को.ऑप. क्रेडीट सो.लि., यांनी कसुरवार कर्जदारांच्या विरूध्द वसुली प्रकीया सुरू केली आहे संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांनी संबंधित कर्जदारांना अनेक सुचना देऊन देखील कर्जदारांनी त्याकडे दुर्लक्ष करून दिलेल्या कालावधीमध्ये थकबाकी रक्कमेचे भरणा करण्यास कसुरवार ठरले आहेत म्हणून संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांनी तारण वाहनांचा कब्जा घेतला आहे. महात्मा फुले को.ऑप. क्रेडीट सो. लि., पनवेल शाखा यांच्याकडून खालील नमुद केलेल्या वाहनांची जाहीर लिलावाव्दारे विकी करून थकीत कर्ज रकमेची वसुली करण्याकरिता खाली नमूद वाहनांचा जाहीर लिलाव ''**जसे आहे तसे**'' या पध्दतीने विक्री करण्याचे ठरले आहे.

| अ.क्र. | कर्जदारांचे नाव | वाहन | रिक्षा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | विजय त्रिंबक मुंढे | बजाज ऑटो रिक्षा | MH ४६ AZ २२४० |

लिलावाचे ठिकाण : बाबा फार्म हाऊस, अदाई गाव, पनवेल- ४१०२०६
लिलावाची तारीख व वेळ : २४/०४/२०२५ वेळ ११:०० वाजता

**टीप :**
१. संस्थेस कोणताही प्रस्तात स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवला आहे.
२. लिलाव हा संस्थेच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांव्दारे अंतिम करण्यात येईल.
३. सदर प्रकाशन हे नमुद कर्ज खात्याचे कर्जदार यांना १५ दिवसांची सूचना असेल.

**सही/-**
**शाखाधिकारी**
**महात्मा फुले को-ऑपरेटिव्ह**
**क्रेडिट सोसायटी लि. करिता**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमिन/भुखंड मालक श्री. सतिश रामचंद्र घरत यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड येथील खालील तक्त्यात नमुद केलेल्या जमिन मिळकती आणि त्या जमिन मिळकतींच्या संपादनाच्या मोबदल्यापोटी अंतिम संमती निवाडाच्या अनुशंगाने मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील २२.५ टक्के योजनेअंतर्गत उलवे नोंड, ता. पनवेल, जि. रायगड येथे वाटप होणारा भुखंड हा ५० : ५० टक्के या तत्वावर विकसीत करण्याकरीता घेवून सदर भुखंडाच्या संपूर्ण क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र हे मे. सिडकोमार्फत त्रिपक्षीय करारनामाव्दारे हस्तांतरीत करुन घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे आणि भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे/हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. प्रति | संपादनापोटी २२.५ टक्के योजनेअंतर्गत वाटप होणा-या भुखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| जासई | ९५/४ | ० - ९६ - ० | ६८५० चौ. मी. |
| | ९५/७ | १ - ३९ - ०० | |
| | ९६/१ | ० - २४ - ५० | |
| | ९६/३ | ० - १० - ९० | |
| | ९६/५ | ० - ११ - ४० | |
| | ९७/३ | ० - २६ - ०० | |
| | ९५/६ | ० - ५८ - ०० | |
| | ९६/२ | ० - २१ - ७० | |
| | ९५/४ | ० - ९६ - ०० | |
| | ९४/१ | ० - १३ - ४० | |
| | ९४/२ | ० - ११ - १० | |
| | ८१/२/अ | ० - ४१ - ०० | |
| | ८१/२/ब | ० - २३ - ०० | |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकत / भुखंडांसंदर्भातील त्रिपक्षीय करारनामा/विकसन करारनामा हा आमचे अशिल आणि वर उल्लेखित जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत/भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकत/भुखंडावर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती/भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशील हे सदरहु भुखंडासंदर्भातील त्रिपक्षीय करारनामा/विकसन करारनामा हा करुन घेतील. याची नोंद घ्यावी

**दिनांक ०४/०४/२०२५** **सही/-**
**धनंदा प्रदिप मोकल**
**(वकील उच्च न्यायालय)**
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं. ९६१९५०५९५८

<u>Without Prejudice</u>

Dispute id - M&M/56/1
02 April 2025

## PUBLIC NOTICE

IT IS BROUGHT TO THE NOTICE OF THE PUBLIC AT LARGE THAT, **Kimitsu Steel Private Limited** (CIN: u51109mh2009ptc189387) is indebted to my client namely **Jawandamal Dhannamal,** also known as Gupta Devkinandan (HUF), through its Karta - Mr. Sanjay Devkinandan Gupta, to the extent of ₹3,10,81,606/- as on 04.02.2025.

PUBLIC AT LARGE IS FURTHER MADE AWARE THAT my client as financial creditor has already filed petition u/s 7 of the Insolvency & Bankruptcy Code, 2016 against ₹3,10,81,606/- numbered as C.P. (IB)/388(MB)2025 which is pending for admission before Hon'ble NCLT, Mumbai Bench-VI, without limitation to its other legal remedies as a creditor.

THAT it has come to the knowledge of my client that, Kimitsu Steel Private Limited now in an attempt to defraud its creditors including my client, is now attempting to fraudulently sell and dispose-off its only immovable property (factory land) i.e. **L-24/25, Taloja MIDC, Taloja, Maharashtra – 410206.**

THEREFORE, NOTICE IS HEREBY GIVEN that all persons and entities may refrain from buying or dealing with the aforesaid immovable property of Kimitsu Steel Private Limited, directly or indirectly. It is cautioned that any such person buying or dealing with the aforesaid immovable property may become liable for criminal conspiracy to 'dishonest or fraudulent removal or concealment of property to prevent distribution among creditors' punishable u/s 320 r/s 61(2) BNS. It is further cautioned that any such transaction may also be liable to be set-aside and declared as a preferential, fraudulent and/or undervalued transaction under the Insolvency & Bankruptcy Code, 2016 in the event the aforesaid insolvency petition is admitted by Hon'ble NCLT.

PUBLIC IS HEREBY CAUTIONED that the aforesaid immovable property is an invaluable for the anticipated corporate insolvency resolution process of the said debtor and otherwise for the creditors in general including my client, and my client will exercise all available legal remedies, against any misconceived attempt to fraudulently dispose-off the said property. For any further information or clarifications, please contact the undersigned.

**sd /-**
**Vaibhav Mahajan**
**Advocate (D/1558/2013)**
**vaibhav@mahajan.law**
**W-31, LGF, Greater Kailash 1**
**New Delhi 110048**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित**
**अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ५,**
(मौजे बोनशेत (भाग), भोकरपाडा (चिपळे) (भाग), देवद (भाग), मोहो (भाग), शिवकर (भाग), विचुंबे (भाग) आणि विहिघर (भाग))
(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) अन्वये)

**क्र. लवाद/नरयो-५/अंतिम परियोजना निवाडा/२०२५/२००२**

शासनाच्या नगर विकास विभागाने श्री. श्रीरंग दि. लांडगे यांची अधिसूचना क्र. टीपीएस- १२२२ / २१५२ / प्र.क्र.१४८ / २२ / नवि-१२, दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(१) अन्वये लवाद म्हणून मंजूर प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र.५ साठी नियुक्ती केलेली आहे.

त्याप्रमाणे निम्नस्वाक्षरीकार यांनी अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र.५ चा निवाडा उक्त अधिनियमांच्या कलम ७२(७) अन्वये तसेच उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी विहीत मुदतीत जाहीर केलेला आहे. ही प्रसिध्द केलेली अंतिम नगर रचना परियोजना प्रामुख्याने भुखंडाचे मूल्य, अंशदान, खर्चाचा अंदाज इत्यादी स्वरुपाची आहे. आणि त्याप्रमाणे प्रत्येक जमीन मालकाला विहीत नमुना क्रमांक ५ मध्ये त्याच्या अंतिम भूखंडाचे मूल्य तसेच अंशदान इत्यादींचा तपशील उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे पोस्टामार्फत पाठविण्यात आलेला आहे.

तथापि, असे आढळून आले आहे की, काही अंतिम भूखंडांच्या जमीन मालकांना अद्याप अशा नोटीसा मिळालेल्या नाहीत. या संदर्भात निम्नस्वाक्षरीकार ही जाहीर नोटीस देत आहेत की, अंतिम भूखंडांच्या ज्या जमीन मालकांना अशा नमुना क्र. ५ मधील नोटीसा मिळालेल्या नाहीत त्या त्यांनी लवादांच्या कार्यालयात तात्काळ येऊन घेऊन जाव्यात. तसेच त्यांना असेही कळविण्यात येत आहे की, जर अंतिम भूखडांचे जमिन मूल्य, अंशदान, इत्यादीबाबत त्यांना अपील करावयाचे असेल तर ही जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या कालावधीत निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दाखल करावे.

दिनांक- १७ मार्च २०२५
पत्ता-: नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
आठवा मजला,बेलापूर रेल्वे स्टेशन,
सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४

**(श्रीरंग दि. लांडगे)**
**लवाद,**
नैना नगर रचना परियोजना क्र. ५,
(मौजे बोनशेत (भाग), भोकरपाडा (चिपळे) (भाग), देवद (भाग), मोहो (भाग), शिवकर (भाग), विचुंबे (भाग) आणि विहिघर (भाग))

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/००२/२०२५-२६

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

### ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**फेब्रुवारी २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | हंसराज जिताराम चौधरी / विकास हंसराज चौधरी | मनोजकुमार सुबेदार मिश्रा / पुष्पांजली एम. मिश्रा | पवल३-२३३१०- २०२४ | २२/११/२०२४ | सदनिका क्र.१०१, पहिला मजला, बि.नं.८, ए विंग, त्रिमुर्ती को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २ | सुशांत संभाजी पवार / नंदा संभाजी पवार | राजेंद्र लक्ष्मण पाटील | पवल २-५८१७- २०२४ | १९/०३/२०२४ | सदनिका क्र. ०१, तळ मजला, सी विंग, बि.नं. सी ४, तपोवन को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ३ | अनिकेत संतोष आलव / सुप्रिया संतोष आलव | मे. राम रत्न बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | पवल २-१२४८१- २०२३ | १८/०७/२०२३ | सदनिका क्र.००२, तळ मजला, बी विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | प्रल्हादकुमार सुशिल जाना / गीता राणी सुशिल जाना | महेश मधुकर मोतेवार | पवल ३-३५९२-२०१७ | ०२/०६/२०१७ | सदनिका क्र. ए २०२, दुसरा मजला, बि.नं.३, कार्तिक्या पार्क को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ५ | लता लक्ष्मण पाटील | मे.राम रत्न बिल्डर्स तर्फे भागीदार विनोदकुमार मनोहरलाल जैन | पवल३-११०४१- २०२३ | १६/०६/२०२३ | शॉप नं.००५, तळ मजला, श्री वसंत विहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ६ | रिता राहूल नारखेडे / राहूल ज्ञानदेव नारखेडे | मोतीलाल राजाराम चौधरी | पवल१-४५४०- २०२४ | १२/०६/२०२४ | शॉप नं. ०७, तळ मजला, विठोबा कॉम्प्लेक्स, बि.नं.२, मौजे पालीदेवद |
| ७ | विकास दत्ताराम डांगमोडेकर / पल्लवी विकास डांगमोडेकर | अंकिता चारुदत्त राऊत / चारूदत्त अनंत राऊत | पवल१-८६५४- २०२४ | २७/११/२०२४ | सदनिका क्र. १, तळ मजला, बि.नं.सी५, तपोवन को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ८ | सकीना कमल चौधरी | प्रदनेश कमलाकर पेणकर | पवल१-८२०६- २०२४ | ०८/११/२०२४ | सदनिका क्र.डी ०३, तळ मजला, बि.नं. ०१, डी विंग, साक्षी पार्क २, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ९ | सुनंदा किसन कुंभार / कोमल अविनाश देसाई / साची ज्ञानेश पेंडकलकर | विजय उत्तम तोंडसे | पवल१-५३४०- २०२४ | १०/०७/२०२४ | सदनिका क्र.इ ०१, तळ मजला, बि.नं.०२, जम्नोत्री सागर को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १० | विष्णु कुंडलिक गव्हाणे / सुवर्णा विष्णू गव्हाणे | बाबूराव हौसेराव पाटील | पवल२-३५६२- २०१८ | १६/०३/२०१८ | सदनिका क्र. १४, दुसरा मजला, बि.नं.सी १, सुयोग को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायूचर |
| ११ | मयत विजय भास्कर पगारे यांचे कायदेशीर वारस निलम विजय पगारे / मयुर विजय पगारे | मयत विजय भास्कर पगारे यांचे कायदेशीर वारस प्रियंका कुणाल साळवे | पवल१-७९२४- २०२४ | २४/१०/२०२४ | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, डी विंग, समृद्धभूमी को.हौ.सौ. मौजे पालीदेवद |
| १२ | शिजो जॉर्ज वदाकेपेदिका | ट्रीजा जॉर्ज वदाकेपेदिका | पवल१-५५८७- २०२४ | १९/०७/२०२४ | सदनिका क्र. ११०६, आय विंग, ११ वा मजला, बालाजी सिम्फोनी का.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

जावक. क्र ३९५/२०२५

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

### ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**मार्च २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाबू बाळू भिसे / तेजस्वी बाळू भिसे | तानाजी अप्पासाहेब चोथे /आशा तानाजी चोथे | पवल१-१७०२- २०२४ | १२/०३/२०२४ | सदनिका क्र.डी २०३, दुसरा मजला, डी विंग, बि.नं.१, कार्तिक्या पार्क को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २ | दिलीप विठ्ठल ढाकरगे/ दिपाली दिलीप ढाकरगे | परकाला श्रीनू | पवल ५-१३२५- २०२५ | २३/०१/२०२५ | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, डी विंग, निलांबरी २ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३ | श्रीधर बाळकृष्ण मंचेकर / अंकिता श्रीधर मंचेकर | निलेश सुकीर तांबडे | पवल ३-२१२२०- २०२४ | १६/१०/२०२४ | सदनिका नं. ३११, तिसरा मजला, श्री नम्रता कृपा, मौजे पालीदेवद |
| ४ | सेब्रिलिन्फेबिया रोबिंसोन | दत्तू महादेव कोडग / शहाजी दत्तात्रेय कोडग | पवल ३-३०४४- २०२५ | ०७/०२/२०२५ | सदनिका क्र. बी १०३, पहिला मजला, निंबेश्वर आंगण को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ५ | मधुकर मायंजी पाखरे | आशा मनोहरं तांबे | पवल ४-३१८६- २०२५ | १८/०२/२०२५ | सदनिका क्र. २०९ ए, दुसरा मजला, बि.नं. सी १, प्रेरणा को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ६ | धनंजय राजेश गुप्ता / प्रिया धनंजय गुप्ता | रमेश श्रीनिवास राव / अपर्णा रमेश राव | पवल ३-२३८४- २०२५ | ३०/०१/२०२५ | सदनिका क्र. बी २०१, दुसरा मजला, बि.नं. १, साक्षी पार्क २ को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ७ | मुन्ना गोविंद झा | इंद्र सेन कुमार (आय.एस.कुमार) | पवल ४-९२११- २०२२ | १८/०७/२०२२ | सदनिका क्र. १२ ए, दुसरा मजला, युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, फोनिक्स को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ८ | नरेंद्र आनंद दासरी / स्वाती नरेंद्र दासरी | मे. स्वामी समर्थ बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर योगेश सुधाकर सावळेकर तर्फे कुलमुखत्यारी सचिन मारुती कल्याणकर/ गडकरी तर्फे निलिमा निलेश नात्ती | पवल २-४८४०- २०२३ | २४/०३/२०२३ | सदनिका नं.२०३, दुसरा २०२३ मजला, शुभारंभ, मौजे पालीदेवद. |
| ९ | संतोष बापूराव घुमरे / राजश्री संतोष घुमरे | राधा श्रीकृष्ण बल्ला / श्रीकृष्णा शावरप्पा बल्ला | पवल ५-१४५२५- २०२१ | १८/११/२०२१ | सदनिका क्र.२०१, दुसरा मजला, बि.नं. ५, साई ईन्क्लेव्ह को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| | प्रविण आनंदा लोंढे / सीता आनंदा लोंढे | निखील दत्तात्रेय नाईकडे | पवल ४-१०१५९- २०२२ | ०४/०८/२०२२ | सदनिका क्र.०२, तळ मजला, वैष्णवी आशिर्वाद, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १० | निखील दत्तात्रेय नाईकडे | चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल २-५४५०- २०२१ | २४/०३/२०२१ | |
| ११ | भानुदास मारोतराव कांबळे | प्रल्हाद साहा | पवल १-५८८१- २०२४ | ०१/०८/२०२४ | सदनिका क्र.१०३, पहिला मजला, बि.नं. ई १, स्नेह कुंज को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १२ | प्रशांत रामचंद्र तांबे / प्रफुल्ल रामचंद्र तांबे / प्रेमा रामचंद्र तांबे | मे. जय संतोषी माता डेव्हलपर्स तर्फे भागीदार चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल २-७०८०- २०२१ | ०७/०५/२०२० | सदनिका क्र.४०२, चौथा मजला, वैष्णवी आशिर्वाद मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १३ | यल्लाप्पा गंगाराम भोसले तर्फे कायदेशीर १३ वारस मारुती यल्लाप्पा भोसले | यल्लाप्पा गंगाराम भोसले तर्फे कायदेशीर वारस सुंकव्वा यल्लाप्पा भोसले | पवल ५-५७७४- २०२० | १५/०९/२०२० | सदनिका क्र.०२, बि.नं.२, ए विंग तळ मजला सहरा कॉम्प्लेक्स को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायूचर |
| १४ | मोइनुद्दीन असलम सोलंकी | मे. बालाजी लाईफ स्टाईल तर्फे प्रोप्रा. आयाज मोहम्मद अली काबाडी | पवल २-१५०९३- २०२३ | २९/०८/२०२३ | सदनिका क्र.३०३, तिसरा मजला, बि.नं. २, बी विंग, बालाजी लाईफ स्टाईल, मौजे पालीदेवद |
| १५ | कौशिक नाथा पवार | प्रसंता मुकुंदा मईती प्रियांका मईती तर्फे कु.मु. म्हणून प्रसंता मुकुंदा मईती | पवल २-७५०५- २०२३ | ०४/०५/२०२३ | सदनिका क्र.३०२. तिसरा मजला, बी विंग, ब्ल्यू हेवन को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १६ | चंद्रकांत शंकर वंजारी | सागर चंद्रकांत वंजारी | पवल १-५१३३- २०२४ | ०३/०७/२०२४ | सदनिका क्र.०५, दुसरा मजला, बि.नं. बी ५ प्रेरणा का. हौ.सो., युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद |
| १७ | पंढरीनाथ विष्णू बाबर /मनिषा पंढरीनाथ बाबर | सुषमा गोपाळ पोळ | पवल ५-५६८८- २०२५ | १९/०३/२०२५ | सदनिका क्र.२०१, दुसरा मजला, बी विंग, शिवकृपा को. हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १८ | शहीद अहमद/ सौ. राबिया | नागेश हिरु पोपेटा | पवल २-१६७६५- २०२२ | ०५/१२/२०२२ | सदनिका क्र.४०२, चौथा मजला, सरस्वती निवास, मिळकत क्र. ५४, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | शितल सुहास सुर्वे | सुहास विष्णू सुर्वे | दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७७३/२०२४ | १५/११/२०२४ | शॉप नं. ०२, तळ मजला, बि.नं. बी ५. प्रेरणा को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २० | मंदा रावसाहेब साळवे / अक्षय रावसाहेब साळवे अक्षता तुषार गायकवाड / अस्मिता रावसाहेब साळवे | रावसाहेब वामन साळवे | दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५१०/२०२४ अन्वये वारस दाखला | ०८/०८/२०२४ | सदनिका नं.०२, साक्षी पार्क टाईप ३ ए, मौजे पालीदेवद |
| २१ | आशिष विजय आंब्रे | बबन नाथा भादवे | पवल २-३५४६- २०२४ | २१/०२/२०२४ | सदनिका क्र. २०७, दुसरा मजला साहिल अपार्टमेंट को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २२ | चंद्रकांत गोमा केणी | चंद्रकांत गोमा केणी व गीता चंद्रकांत केणी | - | - | घर क्र. १३७/१ व १३७१२ मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

जावक. क्र ३९६/२०२५

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## निवडक

### कोपरखैरणेत राम जन्मोत्सव सोहळा

**नवी मुंबई :** कोपरखैरणे सेक्टर १९ ऐ येथील राजराजेश्वरी रणादेवी माता मंदिरात श्री रणादेवी माता मित्र मंडळाच्या वतीने श्री राम जन्मोत्सव रविवारी (दि.६) साजरा केला जाणार आहे. माजी नगरसेवक शिवराम पाटील व माजी नगरसेविका अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री राम जन्मोत्सव सोहळा होणार आहे.

### लिमये वाचनालयाची उद्या विशेष सभा

**पनवेल :** के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.५) सायंकाळी ५ वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या इमारतीच्या पुनर्बांधणीसंदर्भात प्रस्तावावर अनेक विषयावर चर्चा करण्यासाठी तसेच त्या संदर्भात कार्यकारिणीला सर्व अधिकार देण्याबाबत विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे, असे के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या अध्यक्ष सुनीता जोशी यांनी कळविले आहे.

### रामनवमीनिमित्त रक्तदान शिबिर

**पनवेल :** श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, विद्यार्थी वाहक संघटना, नवी मुंबई प्रिंट अँड जर्नलिस्ट असोसिएशन, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रामनवमीच्या मुहूर्तावर रविवारी (दि.६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर डॉक्टर लिखिते हॉस्पिटल समोर महात्मा गांधी पथ विश्राळी नाका पनवेल येथे शिबिर होईल. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबई विमानतळाभोवती सुविधांची आखणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होण्याची चिन्हे दिसत असताना सिडको प्रशसानाने या विमानतळाभोवती अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या अभिनव शहरांची उभारणी करण्याचा निर्णय पक्का केला आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पात विमानतळालगतच्या पुष्पकनगराजवळ शेकडो एकर जमिनीवर लॉजिस्टिक पार्क तसेच 'अटल सेतू'लगतच्या उपनगरांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक शहर (एज्युसिटी) उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. याच भागात मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत तिसरी मुंबई उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.



महामुंबईचे पालकत्व भूषविणाऱ्या सिडकोचा अर्थसंकल्प गेल्या आठवड्यात सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात विजय सिंघल यांनी पावणेसात हजार कोटी रुपयांचा खर्च पणन विभाग, वसाहत विभागाचे व्यवस्थापन, अग्निशमन दल, विमानतळ, पालघर, यूआरएस, प्रशासन, आस्थापनासाठी करण्याचे निश्चित केले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात गृहनिर्माणासाठी ३,२५१ कोटी रुपये आणि पाणीपुरवठ्यासाठी ११२० कोटी रुपयांचा खर्च दर्शविण्यात आला आहे. महामुंबईच्या प्रदेशात वाढत्या नागरीकरणामुळे पाण्याचा प्रश्नही भविष्यात गहन होईल अशी भीती आतापासूनच व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर कोंढाणे धरण प्रकल्पातून वाढीव पाणी मिळविण्यासोबतच हेटवणे धरण प्रकल्पाचे पाणी सिडको नगरांपर्यंत आणण्यासाठी विशेष प्रकल्पांची आखणी या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

सिंघल यांनी १४,१२० कोटी रुपयांचा १० कोटी शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला. सध्या पाणीपुरवठ्याचा ज्वलंत प्रश्न सिडको वसाहतींमध्ये आहे. यावर मात करण्यासाठी एमडी सिंघल यांनी पुढाकार घेतला असून कोंढाणे व हेटवणे या दोन धरण प्रकल्पांसोबत जलशुद्धीकरण केंद्र, जलबोगदे व जलवाहिनीसाठी सिडको मंडळ ११२० कोटी रुपये खर्च करणार आहे. मुंबई ते थेट नवी मुंबई अशा मेट्रो वाहिनीला जोडण्यासाठी सिडकोने यंदाच्या वर्षात सव्वासहाशे कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याव्यतिरिक्त मागील आर्थिक वर्षात सिडकोने नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र (नैना) प्रकल्पासाठी सिडकोने साडेसात हजार कोटी रुपयांची विकासकामांसाठी कंत्राटदार कंपनीची निवड केली. त्यापैकी काहींना आगाऊ रक्कमसुद्धा दिली. नैना प्रकल्पाला शेतकऱ्यांकडून होत असलेला विरोध पाहता सिडकोने यंदाच्या आर्थिक वर्षात ५२७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सिडकोने या अर्थसंकल्पात रेल्वे लेखा शीर्षकाखाली ६५३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

अर्थसंकल्पातील सर्वाधिक खर्च म्हणजे ६,८६८ कोटी रुपये हे सिडकोचा आस्थापना, सिडकोने वेळोवेळी विविध कामांसाठी नेमलेल्या सल्लागार कंपनी, विमानतळाला जोडणाऱ्या दळणवळण प्रकल्प, घरविक्रीसाठी नेमलेली सल्लागार कंपनी, पालघर प्रकल्प आणि प्रशासनावर केला जाणार आहे. अजूनही ६७ हजार घरांचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ही कामे पूर्ण करण्यासाठी सिडको गृहनिर्माणावर ३,२५१ कोटी रुपये खर्च करणार आहे.

### नवे पार्क, नव्या सुविधा

सिडकोने पुष्पकनगर परिसरात यापूर्वीच लॉजिस्टिक पार्कसाठी वेगवेगळ्या प्रकल्पांची आखणी तसेच भूसंपादनासाठी नियोजन सुरू केले आहे. उरण परिसरात जवाहरलाल नेहरू बंदराचा एकीकडे विस्तार होत असताना सिडकोने याच दिशेने जाणाऱ्या मार्गावर भव्य असे लॉजिस्टिक पार्क उभारण्याचे नक्की केले आहे. विमानतळ, जेएनपीए बंदर, अटल सेतू अशा महत्त्वाच्या त्रिकोणात हे पार्क उभारले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक शहर वसविण्याची संकल्पनाही सिडकोने पुढे आणली आहे. या प्रकल्पांसाठी सिडकोने यंदाच्या आर्थिक वर्षात १,०७३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**सिडकोचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प सामान्य नागरिकांच्या प्रत्येक गरजांशी संबंधित असणाऱ्या चार मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व, उत्तम लेखा पद्धती आणि कार्यप्रदर्शन ही या अर्थसंकल्पाची मुख्य उद्दिष्टे आहेत.**
**-विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# क्षयरुग्णांना रोटरी क्लबमार्फत पोषण आहार कीटचे वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

'जागतिक क्षयरोग दिन' निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून जागतिक स्तरावर मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक असलेल्या क्षयरोगाकडे सर्वांच्या एकत्रित सहकार्याने लक्ष वेधण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोगाविषयी व्यापक जनजागृती करण्याकरीता विविध कार्यक्रम झाले.



जागतिक क्षयरोग दिनाच्या अनुषंगाने रोटरी क्लॅब नवी मुंबई एअरपोर्ट सिटी यांच्या वतीने नेरुळ बस स्थानक ते नेरुळ रेल्वे स्थानक येथे क्षयरोग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये नमुंमपामार्फत शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रवीण कटके, वैदयकिय अधिकारी डॉ. निनाद काकडे, डॉ. प्रदीप परदेशी व राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत कार्यरत कर्मचारी तसेच रोटरी क्लबमार्फत अध्यक्ष डॉ. चंद्रकांत सैद, वरिष्ठ रोटरी सदस्य डॉ. जयदीप सेनशर्मा, प्रकल्प अधिकारी डॉ. मुकुल थोरात व साधू वासवानी महाविद्यालयातील विदयार्थी उपस्थित होते. या रॅलीमध्ये क्षयरोगाबाबत घोषणा देत जनजागृती करण्यात आली. रॅलीची सांगता नेरुळ रेल्वे स्थानक येथे करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्षयरोगविषयक पथनाटय सादर केले.

याचप्रमाणे जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रोटरी क्लब नवी मुंबई एअरपोर्ट सिटी यांच्या वतीने 'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान' अंतर्गत 'निक्षय मित्र' बनून २० गरजू क्षयरुगणांना पोषण आहार कीटचे वितरण करण्यात आले. क्षयरुग्णांनी उपचारादरम्यान योग्य पोषण आहार घेतल्यास त्यांचे बरे होण्याच्या दिवसांमध्ये घट होऊन बरे होण्याचे प्रमाण वाढते. या कार्यक्रमाकरिता वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिका, खासगी संस्था व नागरिक एकत्रित आल्यास नवी मुंबईतून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करणे शक्य आहे. तरी नवी मुंबई क्षयरोगमुक्त करण्याकरिता खाजगी संस्था व नागरिकांनी सर्वोतपरी सहकार्य करण्याचे तसेच जास्तीत जास्त नागरिक, संस्था इ. यांनी निक्षय मित्र बनून क्षयरुग्णांना मदत करण्याचे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# लोकनेते दि.बा. पाटील शाळेचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका व आयटीच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणाऱ्या लोकनेते दि. बा. पाटील प्राथमिक आणि माध्यमिक इंग्रजी माध्यम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाले.



या वेळी सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग डॉ. रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, अधिक्षिका कीर्ती महाजन, सी यु एफ संस्थेचे सदस्य अरुण भिसे व शाळेच्या मुख्याध्यापिका कोंकना राहा आणि सर्व शिक्षक आणि पालक आदी उपस्थित होते.

पनवेल महापालिकेची पहिली इंग्रजी माध्यम शाळा आयटीच संस्थेच्या माध्यमातून चालवली जात आहे. यावर्षीचे या शाळेचे हे पहिले स्नेहसंमेलन होते. विद्यार्थ्यांनी वर्षभरात केलेले विविध प्रकल्प यावेळी मांडण्यात आले होते. तसेच वेगवेगळ्या कलागुणांना उजाळा देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेले आर्ट पेंटिंग यांचेदेखील प्रदर्शन भरविण्यात आले होते.

कार्यक्रमास आयटीच संस्थेच्या संचालक सौम्या जैन, गीतेश शिनगारे, विवेक तमाईचेकर, सुशांत खिलारे सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती पालक व विद्यार्थी आदीचे सहकार्य लाभले.



**उरण : येथील पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी शिवसेना शहरप्रमुख सुलेमान शेख यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. सोबत इतर अधिकारी व कर्मचारी.**



**मुंबई : शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी जिल्हाप्रमुख किशोर पाटकर उपस्थित होते.**

# श्री एकविरा चैत्र यात्रेनिमित्त बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री एकविरा देवस्थान ट्रस्ट आयोजित चैत्र सप्तमी ३ एप्रिल ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीत देवींची यात्रा असून ४ एप्रिल २०१४ रोजी देवीचा पालखी सोहळा मोठ्या उत्सवात होणार आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध आई एकविरा देवीची महती जगविख्यात असून आगरी, कोळी, सिकेपी व इतर समाजाची एकविरा देवी कुलस्वामिनी आहे. पालखीला व यात्रेला दरवर्षी लाखो भक्त भाविक दर्शनासाठी येत असतात.

श्री एकविरा देवीची यात्रा व पालखी सोहळा निमित्त चैत्र सप्तमी यात्रा व पालखीचे औचित्य साधून किशोर धुमाळ (वरिष्ठ पोलीस निरीक्षक) यांच्या अध्यक्षतेखाली व जयेंद्रदादा खुणे (अध्यक्ष श्री एकविरा देवी भक्त भाविक मंडळ, महाराष्ट्र राज्य) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखी प्रमुख व स्वयंसेवकांची नियोजन बैठक लोणावळा पोलीस ठाणे येथे झाली. या बैठकीमध्ये किशोर धुमाळ यांनी पालखी प्रमुख व स्वयंसेवकांना कामाचे नियोजम व माहिती देऊन भक्त भाविक व पायी पालखी पदयात्रेकरुंना सहज, सुलभरीत्या व व्यवस्थित दर्शन व्हावे, यात्रेत भांडणे, तंटा अथवा घटना होऊ नये, पिण्याच्या पाण्याची सोय, पुणे ग्रामीण जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केल्याने आदेशाचे पालन करावे. याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या वेळी जयेंद्रदादा खुणे यांच्यासह नितीन कदम (गोपनीय अंमलदार), सतीश कुदळे (पोलीस काँस्टेबल), संतोष वाडेकर (पोलीस काँस्टेबल), विशाल डवले, प्रतीक साळुंखे, किरण गवळी, निलेश म्हात्रे, गणेश सावंत, महेंद्र भोईर, रवी भोईर, संगम चवरकर, हेमंत पाटील, वैभव पाटील आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

# चिरनेरला राम जन्मोत्सव

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्रीराम मंदिरात ५ ते ६ एप्रिल या दरम्यान श्री रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

चिरनेर गावातील, मधीलपाडा व तेलीपाडा या ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, ५ एप्रिल रोजी सायंकाळी सद्गुरु माऊली हसूराम बाबा केळवणे यांच्या शिष्यगणांचा हरिपाठ होईल. तदनंतर रात्री ह भ प हिराजी महाराज शिवकर यांचे कीर्तन होईल. रविवारी ६ एप्रिल रोजी पहाटे ४:३० वाजता काकड आरती सकाळी सात वाजता प्रभू श्री रामचंद्रांचा अभिषेक सोहळा तदनंतर श्रीराम प्रसादिक भजन मंडळ चिरनेर यांचे सुश्राव्य भजन त्यानंतर १० ते १२ या कालावधीदरम्यान हभप प्रकाश महाराज पाटील कुंडे वहाळ यांचे प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्माचे किर्तन होईल. दुपारी बारा ते तीन या दरम्यान चिरनेर परिसरातील नागरिकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. रात्री नऊ वाजता प्रभू श्री रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

श्रीराम नवमी उत्सव सोहळ्याची, मधीलपाडा व तेलीपाडा ग्रामस्थांच्या सहकाऱ्यांने जोरदार तयारी सुरू असून, ग्रामस्थ विशेष परिश्रम घेत आहेत.

# वाढत्या उन्हाच्या तडाख्यात लिंबू खातोय भाव!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने भाजीपाला बाजारात लिंबाचे भाव वाढताना दिसून येत असून किरकोळ बाजारात लिंबू ८ ते १० रुपये एक झाला आहे.

दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की लिंबाचा तोरा वाढतच असतो. उन्हाळ्यात शारीरिक एनर्जी वाढविण्यासाठी अनेक जण लिंबू पाणी किंवा लिंबू सरबतला प्राधान्य देतात. तर काहींना जेवणावर लिंबूची फोड आवर्जून लागतेच.

मे महिन्यापर्यंत हे भाव वधारणार असल्याचे दिसून येत आहे. एपीएमसी भाजी मंडईत लिंबाची आवक कमी झाल्याने दर वाढले. त्याचा फटका किरकोळ बाजाराला बसू लागला आहे. एका लिंबाची किंमत ८ ते १० र रुपये इतकी झाली आहे. तीदेखील लिंबूच्या आकरमानानुसार ठरवली जाते.

### किरकोळ बाजारात १० रुपयांना एक



गेल्या महिन्यापर्यंत दोन रुपयांना एक किंवा १० रुपयांत चार ते पाच असा भाव असणाऱ्या लिंबांची आता मागणी वाढली आहे. तुलनेने बाजारात पुरवठा कमी असल्याने या लिंबाचा भाव थेट १० रुपयांना एक झाला आहे. प्रामुख्याने सरबत, सोडा, उसाचा रस यामध्ये लिंबाचा वापर केला जातो. त्यातच गेल्या आठवड्यापासून उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. त्यामुळे आपसूकच थंड पेयांची मागणी वाढली आहे. त्यासाठी लिंबांना मागणी वाढली आहे. सध्या किरकोळ बाजारात १० रुपयांना एक आणि १५ रुपयांना दोन याप्रमाणे लिंबू मिळत आहेत.

### नारळ पाणीदेखील महाग

उन्हापासून काहीसा दिलासा मिळावा, यासाठी नागरिक शीत पेयाला पसंती देतात. यात विविध फळांचे ज्यूस, आईस्क्रीम, उसाचा रस, मिल्क शेक, फालुदा यांच्या मागणीत वाढ झाली आहे. तर नारळ पाणी महाग झाल्याने पूर्वी पन्नास रुपयाला मिळणारे नारळ पाणी ६०/७० रुपयांना मिळत आहे.

# दहावी १९८५ ग्रुपचा स्नेहमेळावा उत्साहात

## अनेकांची उपस्थिती

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचा स्नेहमेळावा चिरनेर हायवे येथील गजानन फोफेरकर यांच्या समर्थ कृपा या निवासस्थानी बुधवारी (दि.२) मोठ्या उत्साहात झाले.

उपस्थित महिला भगिनीचे हळदीकुंकू झाले. या वेळी गजानन फोफेरकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. ग्रुपमधील आचारी दिपक म्हात्रे, विजय पाटील, प्रकाश फोफेरकर यांनी बनविलेले स्वादिष्ट, रुचकर आणि झणझणीत मटण आणि भाकरीवर सर्वांनी यथेच्छ ताव मारला.

२०१८ साली व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून या ग्रुपमधील मित्र मैत्रिणींस एकत्र आणण्याचे काम या ग्रुपचे अॅडमिन मिलिंद खारपाटील यांनी केले. यानंतर गेली काही वर्ष स्नेह मेळावा, ऐतिहासिक सहली, वृक्षारोपण आदींचे आयोजन करण्यात आले.



या स्नेह मेळाव्यासाठी मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे, पद्माकर फोफेरकर, सूर्यकांत म्हात्रे, प्रकाश फोफेरकर, प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुभाष पाटील, रोहिदास पाटील, हिरामण जोशी, राजेंद्र मुंबईकर, विजय पाटील, उपकार ठाकूर, विजय मुंबईकर, गजानन फोफेरकर, संजय मोकल, दीपक म्हात्रे, चंद्रकांत गोंधळी, रोहिदास ठाकूर, विलास हातनोलकर, प्रमोद चिरनेरकर, रवींद्र पाटील, जगदीश घरत, जयवंत नाईक, प्रदेवी पाटील, मालती भगत, चंद्रप्रभा ठाकूर, मीना परदेशी, सुरेखा पाटील, सुवर्णा म्हात्रे असे २४ विद्यार्थी आणि सहा विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# गुंडगे येथील पाण्यासाठीचे उपोषण मागे

## संघर्ष समितीला मुख्याधिकाऱ्यांनी दिले लेखी आश्वासन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या विरोधात गुंडगे येथील महिलांनी १ एप्रिलपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले होते. कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या लेखी आश्वासनानंतर गुंडगे पाणी प्रश्न संघर्ष समितीच्या वतीने सुरू असलेले बेमुदत साखळी उपोषण सोडण्यात आले.




गेल्या अनेक वर्षांपासून गुंडगे गाव व परीसरात सकाळच्या वेळी पाणी पुरवठा नियमित केला जात होता, परंतु कर्जत नगर परिषदेने कोणत्याही प्रकारची सुचना न देता अचानकपणे पाणी सोडण्याच्या वेळेत बदल केला. पाणी दुपारच्या वेळेत कधीही सोडले जाते. त्यामुळे महिलांना दिवसभरामध्ये बाहेरील दुसरी कोणतीही कामे करता येत नाही. दिवसभर पाण्याची पाट पाहण्यात वेळ जात आहे. कमी दाबाने पाणी येणे, कमी वेळ पाणी सोडणे.

यामुळे गुंडगे परिसरातील महिला अगदी हैराण झाल्या होत्या. या विरोधात कर्जत नगर परिषद प्रशासन तसेच पाणीपुरवठा विभागातील अधिकारी यांना वेळो वेळी तोंडी सांगून तसेच लेखी निवेदन देवूनसुध्दा याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने १ एप्रिल पासून पाणी प्रश्न संघर्ष समिती गुंडगे येथील महिलांच्यामाध्यमातून छत्रपती शाहू महाराज चौक गुंडगे येथे बेमुदत साखळी उपोषणास सुरू केले होते.

मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी उपोषणाच्या स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्या महिलांना लेखी आश्वासन दिले. आपण केलेल्या मागण्या नुसार पाणीपुरवठा सकाळचे वेळेत करावा असे कळविलेले आहे. नगर परिषद क्षेत्रात असणारी गावांमध्ये पाणी पुरवठा पेज नदी येथील उद्धवातून करण्यात येत आहे. नगर परिषद क्षेत्रातील गावांमध्ये योग्य दाबाने पाणी पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून प्रत्येक गावात पाण्याचा दाब वाढविणे करिता आवश्यक उपाययोजनेतुन वेळा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि आपण मोर्चाचे स्वरुपात नगर परिषदेला दिलेले निवेदनानुसार १ एप्रिलपासून गुंडगे विभागात पहाटे ४.३० ते ६.३० व विश्वनगर ६.३० ते ७.३० या वेळेत कायम स्वरूपी पाणी सोडण्यात येईल व त्यानुसार ते सुरुही केलेले आहे व त्यानुसार आपणास यापुर्वी पत्राद्वारे कळविणेंत आलेले आहे. सर्व गावांमध्ये एकाच वेळेत उच्च दाबाने पाणी देणे शक्य नसल्याने आता या प्रमाणे नियोजन करणेंत आलेले आहे त्यास आपण सहकार्य करावे.

पाणी देणेस सुरुवात करण्यात आलेली आहे. वरील दर्शविलेल्या वेळा ही आपल्याला उच्च दाबाने पाणी येण्याचे दृष्टीने निश्चित करणेत येत आहे. आपल्याशी झालेल्या चर्चेनुसार नगर परिषद हद्दीतील सर्व भागात प्रेशरने पाणीपुरवठा करणे करिता वेगवेगळ्या भागात पाण्याच्या वेळा निश्चित करण्यास आल्या आहेत. त्यामुळे केलेल्या नियोजनास आपले सहकार्य मिळावे. पुढील ८ दिवसात नगर परिषदेचे अभियंता अभिमन्यू येलवंडे यांना आपले विभागात प्रत्यक्ष फिरून आपल्याला पाणीपुरवठा योग्य दाबाने होण्याचे दृष्टीने काय उपाययोजना करता येईल, हे पाहून पाहून पुढील नियोजन ठरविण्यात येईल.

तथापि कर्जत नगर परिषद करिता मंजुर करण्यात आलेली सुधारीत पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. सदरच्या योजनेमध्ये सर्व विभागांत पाणीपुरवठा योग्य त्या दाबाने होईल अशा स्वरूपाचे नियोजन करण्यात येणार आहे. तरी सदरील पाण्याच्या समस्येचे निराकरण याद्वारे करण्यात येणार असल्याने आपण करत असलेले उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती करण्यात आली होती.

# सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराचा हात

■ जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रिक्षा व यंत्रसामग्री वाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व बीज भांडवल कर्ज योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्र, रायगड मार्फत बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याच उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे लाभार्थ्यांना रिक्षा व यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले.



या वेळी उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) डॉ. रविंद्र शेळके, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री देवकाते, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, विजयकुमार कुलकर्णी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जी. एस. हरळय्या, तसेच विविध बँक व उद्योग केंद्रांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा उद्योग केंद्र, रायगडसाठी प्राप्त ७४४ प्रकरणांपैकी ७५५ प्रकरणांना बँकेकडून मंजुरी मिळाली असून उद्दिष्टांच्या १०० टक्क्यांहून अधिक पूर्तता करण्यात आली आहे. यशस्वी नियोजन व मार्गदर्शनाखाली हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. तसेच बीज भांडवल कर्ज योजनेतील उद्दिष्टेही १०० टक्के पूर्ण करण्यात आली आहेत.

या योजनेंतर्गत ऑटो रिक्षा व्यवसायासाठी विरेद्र देवराम टिके, वैभव नामदेव जिते आणि पांडुरंग रामा जायनाखवा (रा. अलिबाग) यांना स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्र, अलिबाग शाखेमार्फत कर्ज मंजूर करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत मुग्धा महेंद्र तुपे यांना बँक ऑफ बडोदा, अलिबाग शाखेकडून अनुदानाच्या सहाय्याने सोडा वॉटर व्यवसायासाठी यंत्रसामग्री प्रदान करण्यात आली.

राज्य शासनाच्या या योजनांमुळे जिल्ह्यातील अनेक बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी मिळत असून, त्यांना आर्थिक स्थैर्य व विकासाच्या दिशेने मार्गदर्शन मिळत आहे.

## आंबा फळांचा जाहीर लिलाव; इच्छुक संस्था, व्यक्तींनी सहभाग घेण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

तालुका फळरोपवाटीका आवास ता.अलिबाग या शासकीय फळरोपवाटीकेतील ११० आंबा मातृवृक्षावरील आंबा फळांचा जाहिर लिलाव बोली पध्दतीने मंगळवार १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजीत करण्यात आली असून इच्छुक संस्था/व्यक्तीनी लिलावाच्या दिवशी शासकीय फळरोपवाटीकवर हजर रहावे, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांनी केले आहे.



तसेच फळबागतील फळ लिलाव संबंधी अटी व शर्ती व शासकीय निर्धारीत रक्कम तालुका फळरोपवाटीका आवास ता. अलिबाग या शासकीय फळरोपवाटीकेच्या कार्यालयात शासकीय सुट्टीचा दिवस वगळून ३ एप्रिल २०२५ रोजी पासून पहावयास मिळतील. लिलावात वाजवी दर नाही मिळाले तर पुढे वाढीव मुदत देणे / लिलाव रद्द करणे किंवा अंतिम निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवले आहेत.

## मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांकडून पुरस्कार



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी २ एप्रिल २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मुंबई विभागातील तीन, पुणे विभागातील चार, सोलापूर विभागातील दोन, भुसावळ विभागातील एक आणि नागपूर विभागातील एक अशा ११ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार देऊन गौरव केला.

मागील महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्या दरम्यान दाखवलेली सतर्कता, अनुचित घटना रोखण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय संरक्षा कार्यासाठी प्रशस्तिपत्र आणि २००० रुपये रोख बक्षीस समाविष्ट आहे. या वेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, तसेच या वेळी मध्य रेल्वेचे इतर महत्त्वाचे विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## एमबीबीएस पदवीबद्दल राज खानावकरचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कष्ट व परिश्रम घेऊन बोरलीसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने एम.बी.बी. एस परीक्षा उत्तीर्ण होऊन सर्व ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले आहे.

एम.बी.बी. एस करण्यासाठी नीट सारखी कठीण परीक्षा पास झाल्यावर यामध्ये प्रवेश दिला जातो. राज उदय खानावकर बोर्ली मांडला गावातील आगरी समाजाचा या युवकाने एमबीबीएस पदवी परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे.



या मिळवलेल्या यशाबद्दल आगरी समाज अध्यक्ष उदय खानावकर, संगीता खानावकर राज उदय खानावकर याने एमबीबीएस डॉक्टर ही पदवी केल्याबद्दल त्याचे सर्व मित्र परिवार, नागरिक यांच्या कडून अभिनंदनाचा वर्षाव करून आगरी समाजातील सर्व सदस्य यांनी राज खानवकर यांच्या निवास्थानी जावून राज उदय खानावकर यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

या वेळी समाजातर्फे त्याला शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य मनोहर भोपी, माजी अध्यक्ष लक्ष्मण भोपी, उपाध्यक्ष प्रभाकर भोईर, सचिव प्रभाकर भोईर, खजिनदार सूर्यकांत गुंड, सहखजिनदार अरविंद भोपी, शशिकांत तांबडे, जगदीश खानावकर, अरविंद भोपी, जयंद्र पाटील, सुधीर पाटील, इतेश कमाने, जितेश मिटागरी, चंदकांत गुंड व इतर तसेच आगरी समाजातील महिलादेखील उपस्थित होत्या.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हुणे म्हणून माजी नायब तहसीलदार राजेश नागे, विजय हजारे, सुभाष पाटील, मुरूड तालुका सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष सागर राऊत, मुरूड नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, लक्ष्मण चौलकर, हेमंत चौलकर, शरद कनेटकर, जगदीश वैष्णव, कन्हैया जैस्वाल, नरेंद्र शिंदे, समीर धाटवकर आदी उपस्थित होते.

## कर्जतमधून ऑटो रिक्षाची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतून एक ऑटो रिक्षा चोरीला गेली आहे. चोरट्याने थेट रिक्षाच चोरल्याने कर्जत शहरात मात्र याची जोरदार चर्चा रंगली आहे. फिर्यादी यांच्या घरासमोरून ही ऑटो रिक्षा चोरून नेल्याने रिक्षा मालकाने कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेत आपली रिक्षा चोरीला गेली असल्याची तक्रार दाखल केली आहे.




कर्जत मौजे बोध्दनगर कचेरीरोड,नगरपालीकेच्या समोर राहणारे फिर्यादी यांच्या मालकीची रिक्षा (एमएच ४६ बीडी ५७४७) ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास चोरली होती.

याबाबत परिसरात रिक्षेचा शोध देखील घेण्यात आला होता. मात्र रिक्षा न सापडल्याने फिर्यादी रिक्षा मालक यांनी कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली. ५० हजार रुपये किमतीची ही रिक्षा असल्याचे रिक्षा मालकाकडून सांगण्यात आले आहे.

मागील काही दिवसात कर्जत नगरपालिका हद्दीत घर फोडी, दुकान फोडण्याचे प्रकार समोर आले होते. तसेच कर्जत रेल्वे स्थानक परिसरातून देखील मोटासायकल चोरीला गेल्याची घटना घडली होती. मात्र आता कर्जत शहरातून चक्क अज्ञात चोरट्याने ऑटो रिक्षाच चोरल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार स्वप्नील येरुणकर करीत आहेत.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या प्रशिक्षणार्थ्यांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण कार्यकाळ सहा महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी १० मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी आपले सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशा प्रशिक्षणार्थींना उर्वरित पाच महिने कार्यप्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या वाढीव पाच महिन्यांच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक उमेदवार तसेच सद्य:स्थितीत प्रशिक्षण घेत असलेले उमेदवार व योजनेचा नव्याने लाभ घेण्यास इच्छुक उमेदवारांनी आधार पडताळणी व आवश्यक कागदपत्रे (उदा. आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र इ.) तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी केले आहे.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दि.०९ जुलै २०२४ अन्वये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार प्रशिक्षणार्थी यांना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येत होते. आता मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घोषित केल्यानुसार आता दि.१० मार्च २०२५ शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण कार्यकाळ सहा महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला.

या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन DBT द्वारे ऑनलाईन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे योजनेच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्राचा नमुना प्रशिक्षणार्थी व आस्थापना यांनी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड-अलिबाग यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. यापुढे Aadhar Seeded DBT होऊ शकेल. त्यामुळे सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी बँक खाते Aadhar Seeding करून घ्यावी.

तसेच ज्या आस्थापना हे या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थी घेण्यास इच्छूक आहेत त्या आस्थापनांची शासन निर्णयानुसार कार्य प्रशिक्षणार्थी सामावून घेण्याची क्षमता आवश्यक कागदपत्रांची तपासणी/पडताळणी करूनच उमेदवारांना आस्थापनेवर रुजू करून घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दि.१० मार्च २०२५च्या शासन निर्णयानुसार आधार व कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेण्यात येणार नाही. तसेच, प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांची नोंदणी आधार पडताळणी (Aadhar Verify) अनिवार्य आहे. ज्या बँक अकाऊंट ला आधार लिंक आहे, तोच बँक अकाऊंट नंबर योजनेच्या विद्यावेतन DBT साठी नमुद करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थ्यांच्या आधार पडताळणीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे-योजनेच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील Intern Login Sign up आधार नं. प्रविष्ट करणे- send OTP-Verify OTP The intern enters the received OTP Successful Login and Access, Once OTP verification is successful, the intern gains access to the system.

सर्व इच्छुक कार्य प्रशिक्षणार्थी उमेदवार आणि आस्थापनानी प्रशिक्षणार्थी यांनी आधार पडताळणी करणे तसेच आस्थापना/नियोक्ते यांनी कागदपत्रे तपासणीसाठी आपल्या जिल्ह्याचे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड-अलिबाग यांच्याशी दि.३० एप्रिल २०२५ पर्यंत संपर्क साधून आवश्यक ती तपासणी करून घ्यावी.

उमेदवारांना व आस्थापनांना त्याबाबत काही समस्या असल्यास या कार्यालयाचे दुरध्वनी (०२१४१-२२२०२९) व मोबाईल (९३२१०६७७४५, ९८५०४१११८७)वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## डोंगरी येथे स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड डोंगरी येथील मठ संस्थापिका त्रिषा पाटील यांच्या मठात स्वामी समर्थ प्रगटदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळी ५ वा.पासून नामस्मरणाला सुरुवात झाली.



त्रिशाताईंच्या मार्गदर्शनाखाली विश्वशांतीची साठी होम हवन झाला तसेच गुरु माऊलीताई यांनी राष्ट्रगीत दरवर्षीप्रमाणे घेतले. डॉ. दत्तात्रय पाटील आणि ताई यांच्या आशीर्वादाने एक स्वामी परिवार त्यांनी उभा केला आहे. मठातील सर्व विविध फुलांची सजावट करण्यात आली होती.

स्वामींशी हितगुज झाल्यावर पालखी निघाली. मुरूड येथील पद्म दुर्ग ढोल पथकांनी साथ दिली. डोंगरी गावात पालखी श्री स्वामी समर्थ या नाम स्मरणात श्रींच्या पादुका पालखी तून दिमाखातफिरल्यावर रात्री १० वा. पालखी मंदिरात आली व स्वामी प्रगट दिनाची सांगता झाली. अनेक वर्षे डोंगरी मठात प्रगट दिन साजरा होत असतो.

## उमेश भायदेंचा सेवापूर्ती समारंभ



**मुरूड : प्रतिनिधी**

जयश्रीराम पतसंस्था मर्या. मुरुडतर्फे वसुली अधिकारी उमेश सहदेव भायदे हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्याने सेवापूर्ती समारंभाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. चेअरमन दिलीप जोशी यांच्या हस्ते श्रीदत्त गुरु प्रतिमा, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन भायदे यांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी संस्थेचे चेअरमन दिलीप जोशी, व्हा. चेअरमन प्रा. मेघराज जाधव, सचिव सुनिल विरकुड, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, संचालक ॲड. मोहन तांबडकर, ॲड संजय जोशी, डॉ संजय पाटील, समीर उपाध्ये, जयश्री जोशी, अशोक दिवेकर, प्रमोद उपाध्ये, प्रा. अनुप सिंह, सरव्यवस्थापक संजय ठाकूर व मुरुड सह नांदगाव, चेहेर शाखेचे कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

## मोहोपाड्यातील समर्थ बैठक हॉलला सजावट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हिंदू नववर्ष म्हणजे चैत्र शुध्द प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यानिमित्त असणारी श्री समर्थ बैठक गुरुवारी (दि.३) असल्याने मोहोपाडा येथील समर्थ बैठक हॉल आकर्षक रोषणाईने सजविण्यात आला.

बैठक हॉलमधील श्री दत्तगुरुंच्या स्थापनेभोवती आकर्षक फुलांच्या सजावट केली असून विविधारंगी फुलांच्या माला लावल्या आहेत. हॉलच्या आत बाहेर आकर्षक रांगोळ्या व लाईट माला लावल्याने



दासभक्तांसह नागरिकांचे ही लक्ष वेधले जात आहे. गुढीपाडव्याची बैठक असल्याने मोहोपाडा समर्थ बैठक हॉलची आकर्षक सजावट करण्यात आली होती. गुढीपाडव्याची ही समर्थ बैठक ऑनलाईन असल्याने स्वता:महाराष्ट्र भुषण डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांनी बोध दिले. या वेळी राज्यातील समर्थ दास भक्तांनी ऑनलाईन श्रवणाचा लाभ घेतला.

# गुजरातचा बंगळुरूवर दमदार विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दमदार सांघिक खेळाच्या जोरावर गुजरात टायटन्स संघाने बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर दणदणीत विजय साकारला. नाणेफेक जिंकल्यानंतर गुजरातच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत बंगळुरूला १६९ धावांत रोखले. त्यानंतर छोट्या स्टेडियमवर जोस बटलर आणि साई सुदर्शन यांनी मॅरेथॉन भागीदारी साकारत विजयाचा पाया रचला.



छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातचा कर्णधार शुबमन गिल झटपट बाद झाला, पण यानंतर साई सुदर्शन-जोस बटलर जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ४७ चेंडूत ७५ धावांची भागीदारी करत बंगळुरूच्या गोलंदाजांना निरूत्तर केले. हेझलवूडने सुदर्शनला बाद केले. सुदर्शन बाद झाल्यावर बटलरने सामन्याची सूत्रे हाती घेतली. शेरफन रुदरफोर्डने त्याला चांगली साथ देत गुजरातच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. बटलरने ३९ चेंडूत पाच चौकार आणि सहा षटकारांसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १८ चेंडूत ३० धावांची खेळी करत बटलरला चांगली साथ दिली.

तत्पूर्वी अर्शद खानने विराट कोहलीला बाद करत बंगळुरूला पहिला धक्का दिला. फिल सॉल्टला जोस बटलरने जीवदान दिले, पण तो याचा फायदा उठवू शकला नाही. त्याने १४ धावा केल्या. मोहम्मद सिराजने त्याला बाद केले. सिराजनेच देवदत्त पड्डीकलला माघारी धाडले. पॉवरप्लेच्या षटकांचा बंगळुरू फायदा उठवू शकले नाही. रजत पाटीदार स्थिरावलाय असे वाटत असतानाच इशांत शर्माने त्याला बाद केले.

लायम लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा यांनी सहाव्या विकेटसाठी ३८ चेंडूत ५२ धावांची भागीदारी केली. साईकिशोरच्या गोलंदाजीवर आक्रमण करण्याचा जितेशचा प्रयत्न फसला. त्याने २१ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. जितेशच्या जागी आलेल्या टीम डेव्हिडने लिव्हिंगस्टोनला चांगली साथ दिली. लिव्हिंगस्टोनने ४० चेंडूत एक चौकार आणि पाच षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. टीम डेव्हिडने १८ चेंडूत ३२ धावा केल्या. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे बंगळुरूने १६९ धावांची मजल मारली. मोहम्मद सिराजने दोन, तर साई किशोरने दोन विकेट्स घेतल्या.

## रायगडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडची अष्टपैलू क्रिकेटपटू रोशनी रवींद्र पारधी हिची महाराष्ट्राच्या १७ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. यापूर्वी रोशनीची महाराष्ट्राच्या १५ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट संघातदेखील निवड झाली होती.

रोशनी पारधी ही रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीची अष्टपैलू आहे. ती जलदगती गोलंदाज व सलामीवीर फलंदाज आहे. तिने सातत्याने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले आहे.



रोशनीने गतवर्षी झालेल्या १५ वर्षाखालील आंतरजिल्हा निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत लागोपाठ तीन शतके झळकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

एसबीसी महाड क्रिकेट अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक आवेश चिचकर, अध्यक्ष बशीर चिचकर यांनी रोशनीच्या खेळामधील प्रगतीसाठी अथक परिश्रम घेत आहेत. परिणामी तिची निवड महाराष्ट्राच्या मुलींच्या क्रिकेट संघात झाली.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी रोशनी व तिच्या पालकांचे, प्रशिक्षकांचे कौतुक व अभिनंदन केले. रोशनीला भविष्यात लागेल ती मदत असोसिएशन करेल, असेही पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

## आरसीबीविरुद्ध खेळताना सिराज भावूक

**मुंबई : प्रतिनिधी**

रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध बुधवारी झालेल्या लढतीत गुजरात टायटन्स संघाच्या मोहम्मद सिराजने तीन विकेट्स पटकावत विजयात मोलाचे योगदान दिले. सिराजलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. सामन्यादरम्यान सिराज आधीच्या संघासमोर खेळताना भावूक झाल्याचे दिसून आले.

विराट कोहलीला त्याच्या स्पेलमधील पहिल्याच षटकात गोलंदाजी करताना मोहम्मद सिराज अचानक थांबला आणि पुन्हा गोलंदाजीसाठी गेला. हा व्हिडीओ चांगलाच व्हायरल होत आहे.



सिराजने बंगळुरूच्या धोकादायक फिल सॉल्टला माघारी धाडले. सॉल्टला एकदा जीवदान मिळाले होते, पण त्याला त्याचा फायदा उठवता आला नाही. देवदत्त पड्डीकलला सिराजने त्रिफळाचीत केले. अर्धशतक करून स्थिरावलेल्या लायम लिव्हिंगस्टोनला सिराजनेच बाद केले. चार षटकात अवघ्या १९ धावांच्या मोबदल्यात सिराजने तीन विकेट्स पटकावल्या आणि गुजरातच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली.

## विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. ४) रायगड जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

विचुंबे ग्रामपंचायतीसमोरील विठ्ठल रखुमाई मैदानात होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी ४ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

## यशस्वी जैस्वाल आता गोव्याकडून खेळणार



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा तरुण, तडफदार व धडाकेबाज सलामीवीर यशस्वी जैस्वालने मुंबई संघाला राम राम ठोकण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी डोमॅस्टिक हंगामात यशस्वी गोव्याकडून खेळताना दिसणार आहे.

यशस्वीने या संदर्भात मुंबई क्रिकेट असोसिएशनला ई-मेल लिहिला. यशस्वीच्या निर्णयाने एमसीएचे पदाधिकारी आश्चर्यचकित झाले, पण त्यांनी त्याला ना हरकत प्रमाणपत्र जारी केले आहे. यामुळे यशस्वीचा गोव्यासाठी खेळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. डोमेस्टिक क्रिकेटमधल्या चॅम्पियन संघाऐवजी गोव्याकडून खेळण्याचे कारण यशस्वीने अद्याप स्पष्ट केलेले नाही.

क्रिकइन्फो संकेतस्थळाने दिलेल्या वृत्तानुसार गोवा क्रिकेट असोसिएशनचे सचिव शंभू देसाई यांनी यशस्वीशी चर्चा केली. टेस्ट, वनडे आणि ट्वेन्टी-२० अशा तिन्ही प्रकारात यशस्वीने धावांची टांकसाळ उघडली आहे. आयपीएल स्पर्धेत राजस्थान रॉयल्सने त्याला १८ कोटी रुपये खर्चून रिटेन केले आहे. आम्ही एक चांगला संघ उभारू इच्छितो.

देशातील सर्वोत्तम प्रतिभाशाली खेळाडू गोव्याकडून खेळावेत असा आमचा प्रयत्न आहे. या विचारातूनच आम्ही यशस्वीशी संवाद साधल्याचे देसाई यांनी सांगितले.

## आयुष म्हात्रेला सीएसकेने पुन्हा चाचणीसाठी बोलावले

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलदरम्यान चेन्नई सुपर किंग्जच्या कॅम्पमधून एक बातमी समोर येत आहे. धोनीचा संघ एक बदल करण्याचा विचार करत असून त्यांनी मुंबईचा १७ वर्षीय सलामीवीर फलंदाज आयुष म्हात्रेला चाचणीसाठी बोलावले आहे. या घडामोडीनंतर चर्चांना जोर आला आहे, ज्यामध्ये मुंबईकर फलंदाजाचा सीएसके संघात समावेश होऊ शकतो.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये आयपीएल लिलावापूर्वी म्हात्रेने सीएसकेसाठी चाचणी दिली होती. त्या वेळी त्याला सीएसके विकत घेईल असा अंदाज बांधण्यात आला, पण ऐन लिलावात म्हात्रेकडे पाठ फिरवण्यात आली. आता पुन्हा एकदा सीएसकेला म्हात्रेची आठवण झाली आहे. त्यांनी आयपीएल हंगामाच्या मध्यभागी मुंबईकर खेळाडूला चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियममध्ये चाचणीसाठी बोलावले आहे.

## ‘त्या’ सेलिब्रेशनसाठी दिग्वेश राठीला दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्ज संघाने लखनऊ सुपर जायंट्स संघाला आठ गडी राखून पराभूत केले. या सामन्यात पंजाबचा सलामीवीर प्रियांश आर्य याला बाद केल्यानंतर गोलंदाज दिग्वेश राठीने सेलिब्रेशन केले. त्याने विराटच्या सेलिब्रेशनची नक्कल केली. त्यामुळे त्यासाठी दंड ठोठवण्यात आला.

पंजाब किंग्जचा संघ आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला. त्यांची सुरुवात चांगली झाली होती, पण पॉवर प्लेमध्ये तिसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर त्यांची पहिली विकेट पडली. प्रियांश आर्य मोठी फटका मारायला गेला, मात्र तो झेलबाद झाला. दिग्वेशने त्याची विकेट घेतल्यानंतर त्याच्या जवळ जाऊन ‘नोटबूक सेलिब्रेशन’ केले. विराट कोहलीनेही विंडिजचा केसरिक विल्यम्स याच्याविरोधात असे सेलिब्रेशन केले होते तसेच सेलिब्रेशन दिग्वेश राठीने केले. त्याला मात्र हे सेलिब्रेशन करणे महागात पडले, कारण त्याला दंड ठोठवण्यात आला आहे.

दिग्वेश राठीला त्याच्या सेलिब्रेशनसाठी सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के रक्कम दंड म्हणून ठोठवण्यात आली तसेच एक डेमेरिट पॉइंटही (नकारात्मक गुण) देण्यात आला. दिग्वेश राठीने लेव्हल १चा गुन्हा केला असल्याचा आरोप त्याच्यावर लावण्यात आला. हा गुन्हा आयपीएलच्या आचारसंहितेचा भंग केल्याबद्दलचा आहे. त्याने गुन्हा मान्य केला असून त्याच्यावरील कारवाईही मान्य असल्याचे स्पष्ट केले.

## जागतिक टी-२० अष्टपैलू खेळाडूंमध्ये हार्दिक पांड्याच अव्वलस्थानी!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या याने आयसीसी टी-२० क्रमवारीत अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

पाकिस्तानविरुद्धमालिका विजयानंतर न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज जेकब डफी याने आयसीसीच्या गोलंदाजी क्रमवारीत पहिले स्थान मिळवले आहे. तो पहिल्यांदाच नंबर १ टी-२० गोलंदाज बनला, पाकिस्तानविरुद्ध पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत त्याने ८.३८च्या सरासरीने १३ बळी घेतले. डफीच्या बळावर न्यूझीलंडने पाकिस्तानला ४-१ने हरवून मालिका जिंकली, २०१८मध्ये ईश सोढीनंतर डफी हा पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमध्ये अव्वल स्थान पटकविणारा न्यूझीलंडचा पहिला खेळाडू बनला आहे.



भारताचा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती याची टी-२० क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर घसरण झाली. गेल्या दोन महिन्यांत भारताने एकही टी-२० सामना खेळलेला नाही. त्यामुळे गोलंदाजीत भारतीय खेळाडूंना फटका बसला आहे.

फलंदाजांच्या यादीत ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड पहिल्या आणि भारताचा अभिषेक शर्मा दुसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडचा फिल सॉल्ट तिसऱ्या, तिलक वर्मा चौथ्या आणि सूर्यकुमार यादव पाचव्या स्थानावर आहे.

हार्दिक पांड्या टी-२० अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत २५२ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर असून अक्षर पटेल १३व्या स्थानावर आहे.

## लखनऊच्या पराभवानंतर मेन्टॉर जहीर खान खेळपट्टीवरून नाराज

**लखनऊ : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्ज संघाने घरच्या मैदानावर खेळणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्सचा पराभव केला. लखनऊचा तीन सामन्यांमध्ये हा दुसरा पराभव होता. यानंतर या संघाचा मेन्टॉर जहीर खानने खेळपट्टीवरून नाराजी व्यक्त केली आहे.

१७२ धावांचा पाठलाग करणाऱ्या पंजाबने प्रभसिमरनसिंग याच्या ३४ चेंडूतील ६९ धावांच्या खेळीमुळे लखनऊवर आठ गडी राखून विजय साजरा केला. सामन्यानंतर लखनऊ संघाचा मेन्टॉर जहीर म्हणाला, मी निराश आहे. हा घरच्या मैदानावर सामना होता. तुम्ही पाहिले असेल की, घरच्या मैदानावर स्थानिक संघाला लाभ होईल, अशी खेळपट्टी तयार केली जाते. क्यूरेटरने मात्र हा विचार केला नसेल. असमान उसळी घेणारे चेंडू पाहून ही पंजाबच्या क्युरेटरने खेळपट्टी तयार केली असावी, असेच वाटत होते.

लखनऊ संघात येण्याआधी जहीरने मुंबई संघात क्रिकेट विकास विश्व प्रमुखपद सांभाळले. क्यूरेटर पंजाबहून आला असावा. त्यामुळे स्थानिक चाहत्यांना आपल्या संघाला विजयी होताना पाहता आले नाही, अशी टीका त्याने केली.

मी या संघासाठी नवीन आहे. नेमके काय घडले हे पहावे लागेल. पुढे असे घडू नये आणि चाहत्यांच्या पदरी निराशा येऊ नये याची काळजी घ्यावी लागेल. पराभवानंतरही माझा फोकस निकालापेक्षा प्रक्रियेवर असेल. काही गोष्टी सुधाराव्या लागतील. काही खेळाडू जखमी असल्याची मला चिंता नाही. पराभवानंतरही खेळाडूंची कामगिरी प्रभावी ठरली ही सकारात्मक बाब आहे. संघात विचारक्षमता, झुंजारवृत्ती व विजयाची भूक कायम राखून चाहत्यांना विजयाची भेट द्यायची आहे, असेही जहीरने म्हटले.

## सचिनकन्या सारा तेंडुलकरने जीईपीएलमध्ये खरेदी केला संघ



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात सध्या आयपीएलचा हंगाम सुरू आहे. याचदरम्यान मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकर याची मुलगी सारा हिने एक क्रिकेट संघ खरेदी केला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार डिजिटल मनोरंजन आणि तंत्रज्ञानातील जागतिक आघाडीची कंपनी जेटसिंथेसिसने घोषणा केली आहे की, साराने ग्लोबल ई-क्रिकेट प्रीमियर लीग (जीईपीएल)मध्ये मुंबई फ्रँचायझी खरेदी केली आहे. या लीगचा दुसरा सीझन लवकरच सुरू होणार आहे.

जीईपीएल ही स्पर्धा ‘रिअल क्रिकेट’ या तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या गेमवर खेळली जाते. आतापर्यंत ३० कोटींहून अधिक लोकांनी ते डाउनलोड केले आहे. पहिल्या हंगामाच्या सुरुवातीपासूनच या लीगची तरुणांच्यात प्रचंड क्रेझ आहे. रिपोर्ट्सनुसार जीईपीएलचा मल्टीप्लॅटफॉर्म रिच ७० मिलियनहून अधिक आहे आणि जिओसिनेमा आणि स्पोर्ट्स१८वर २.४ दशलक्षाहून अधिक मिनिटे स्ट्रीम केली गेली आहेत, ज्यामुळे जीईपीएलने क्रिकेट ई-स्पोर्ट्समध्ये आपली ओळख निर्माण केली आहे.

आपला आनंद व्यक्त करताना सारा तेंडुलकर म्हणाली की, ई-स्पोर्ट्समध्ये क्रिकेटचा आनंद घेणे रोमांचक असेल.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com